❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २८८ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



ज्ञानेश कुमारांना सर्वोच्च न्यायालयाचा मोठा झटका

विरोधातील सर्व याचिका मंजूर, २७ ऑक्टोबरला होणार एकत्रित सुनावणी

■ मुंबई (दै. संध्या)

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता, मतदार याद्यांमधील त्रुटी आणि स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन प्रक्रियेवरून ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केल्या आहेत. न्यायालयाने या सर्व याचिका एकत्र करून यावर येत्या 27 ऑक्टोबर रोजी सुनावणी घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणातील सर्व याचिका स्वीकारताना मुख्य निवडणूक आयुक्तांसह इतर दोन निवडणूक आयुक्तांनाही प्रतिवादी केले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू आणि विवेक जोशी यांना या प्रकरणात प्रतिवादी बनवण्यात आले आहे.

विरोधी पक्षांचे प्रमुख नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, खासदार संजय राऊत, सुप्रिया सुळे, एम. ए. बेबी, डी. राजा, महुआ माझी, सौगत रॉय आणि ई. टी. मोहम्मद बशीर या 11 प्रमुख नेत्यांचा याचिकाकर्त्यांमध्ये समावेश आहे. सुनावणीदरम्यान



सर्वोच्च न्यायालयाने फॉर्म 6 बाबत एक अत्यंत महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, त्यांनी फॉर्म 6 बाबत कोणताही अंतिम निर्णय दिलेला नाही. बिहारमध्ये फॉर्म 6 चा असा कोणताही मुद्दा नव्हता किंवा न्यायालयाने सुधारित फॉर्म 6 ला कोणतीही अधिकृत मान्यता दिलेली नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

याआधी इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सरन्यायाधीश यांची भेट घेण्याची वेळ मागितली होती. मात्र, अधिकार श्रेणी आणि घटनात्मक मर्यादांचा हवाला देत सरन्यायाधीशांनी नेत्यांना भेटण्यास नकार दिला. 'थेट भेटण्याऐवजी न्यायालयात अधिकृत याचिका दाखल करा' असा सल्ला सरन्यायाधीशांनी राहुल गांधी यांना दिला होता. त्यानुसार राहुल गांधींच्या लीगल टीमने सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीमध्ये अधिकृतपणे याचिका दाखल केली असून त्याला डायरी नंबरही प्राप्त झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे नेते पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली सर्व विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयाच्या दिशेने मोर्चा काढत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या तातडीच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

सुप्रीम कोर्टात यापूर्वी दोन याचिका दाखल

- या प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अधिकारांचा वापर करून मुख्य निवडणूक आयुक्तांना निलंबित ठेवावे, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली.
- याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, निवडणूक आयोगातील वादाचे मुख्य कारण SIR प्रक्रिया होती. त्यामुळे विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रिया तसेच या प्रक्रियेअंतर्गत करण्यात आलेल्या सर्व कारवाया, निर्णय आणि निर्देश तात्काळ रद्दबातल घोषित करावेत.
- या संपूर्ण वादाची चौकशी करण्यासाठी सुप्रीम कोर्टाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात यावी. निष्पक्ष चौकशीसाठी या समितीला आवश्यक अधिकार देण्यात यावेत. तसेच, या प्रकरणाशी संबंधित सर्व कागदपत्रे सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात यावीत.
- या प्रकरणाशी संबंधित सर्व इलेक्ट्रॉनिक तसेच कागदी पुरावे सुरक्षित जतन करून ठेवण्यात यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.
- 'क्वो वॉरंटो' अंतर्गत मुख्य निवडणूक आयुक्तांना जाब विचारण्याची मागणी : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी कोणत्या अधिकाराच्या आधारे संबंधित निर्णय घेतला, याचा खुलासा त्यांच्याकडून मागवण्यात यावा. दोन सदस्यांनी असहमती दर्शवली असताना त्यांनी स्वतः निर्णय कोणत्या आधारावर घेतला, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे.

थोडक्यात...

रेल्वे प्रवासात घुसमट; अतिरिक्त मागणी

पालघर : दैनिक संध्या

नोकरी, व्यवसाय, शिक्षणासाठी मुंबईत दररोज प्रवास करणाऱ्या पालघर जिल्ह्यातील हजारो प्रवाशांना पहाटे चारपासून सकाळी साडेदहा पर्यंत मुंबईच्या दिशेने केवळ १४ रेल्वेसेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे अपुऱ्या रेल्वेसेवेमुळे गर्दीचा सामना करावा लागत आहे. परतीच्या प्रवासासाठी सायंकाळी पाच ते रात्री सव्वा अकरादरम्यान ११ सेवा आहेत. त्यापैकी दादरहून दोन, फ्लाईंग राणी, वलसाड एक्स्प्रे, लोकशक्ती एक्स्प्रेस मुंबई सेंट्रलहून सुटतात. उर्वरित गाड्या विरारहून उपलब्ध होतात. मात्र, लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये सर्वसाधारण डबे कमी असल्याने दैनंदिन प्रवाशांना लोकलमध्ये चढण्यासाठी कसरत करावी लागते. त्यामुळे विरारहून पालघर, बोईसर, वाणगाव, डहाणूच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांना गर्दीमुळे जीव नकोसा होतो. महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिकांना अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्याने कामाच्या तसेच वैयक्तिक दिनक्रमावर परिणाम झाला आहे. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने गर्दीच्या वेळेत अतिरिक्त लोकल सोडण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. पण प्रशासनाकडून फक्त आश्वासनांवर बोळवण केली जात आहे.

भाजी खरेदी करताना आजोबा कोसळले

पालघर : दैनिक संध्या

बाजारात भाजी खरेदी करण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने ते रस्त्यावर कोसळले. यावेळी रहीमनगर पोलीस चौकीत तैनात असलेले पोलीस शिपाई संदीप यादव यांनी प्रसंगावधान राखत त्यांना तातडीने सीपीआर दिला. त्यांच्या प्रयत्नांमुळे वृद्धाची प्रकृती सुधारली. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून संदीप यादव यांच्या तत्परतेचे कौतुक होत आहे. महानगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अखिलेश मिश्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, महानगर सेक्टर-सी परिसरात राहणारे अनिल कुमार रविवारी दुपारी रहीमनगर येथील बाजारात भाजी खरेदी करण्यासाठी गेले होते. एका दुकानातून बटाटे घेतल्यानंतर ते पुढे जात असताना त्यांच्या छातीत अचानक तीव्र वेदना सुरू झाल्या. काही क्षणांतच ते रस्त्यावर कोसळले. ही घटना पाहून परिसरातील दुकानदार आणि नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मदत करणे आवश्यक होते. जवळच असलेल्या रहीमनगर पोलीस चौकीत तैनात असलेले संदीप यादव यांनी गर्दी पाहताच घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अनिल कुमार यांची अवस्था ओळखून तातडीने सीपीआर देण्यास सुरुवात केली. सुमारे दीड ते दोन मिनिटे त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले. त्यानंतर वृद्धाच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले. पुढील उपचारांसाठी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

महाराष्ट्राच्या लोककलेतील दिमाखदार पर्वाची अखेर

■ मुंबई (दै. संध्या)

मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात आपल्या समर्थ अभिनयाने आणि बहारदार लावणीने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या लोककलेतील एक दिमाखदार पर्व संपले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, मधू कांबीकर यांनी महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेचा अस्सल बाज आयुष्यभर जपला. लोककलेच्या व्यासपीठावर सुरू झालेला त्यांचा प्रवास मराठी नाटक आणि चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचला. आपल्या सहजसुंदर अभिनयाने, वैशिष्ट्यपूर्ण नृत्यशैलीने आणि लावणीच्या प्रभावी सादरीकरणाने त्यांनी रसिकांच्या मनावर अनेक दशके अधिराज्य गाजवले. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव येथे जन्मलेल्या मधू कांबीकर यांना बालपणापासूनच लोककलेचा समृद्ध वारसा लाभला. अत्यंत लहान वयात रंगमंचावर पाऊल ठेवत त्यांनी आपल्या कलेच्या बळावर स्वतंत्र स्थान निर्माण केले. लावणी आणि तमाशासारख्या महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांना व्यापक प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी 75 हून अधिक चित्रपटांसह अनेक नाटकांमधून आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयाची छाप उमटवली. ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेच्या व्यासपीठापासून



■ ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची श्रद्धांजली

चित्रपटसृष्टीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा जिद्द, संघर्ष आणि कलेवरील निष्ठेचा प्रेरणादायी प्रवास होता. आपल्या कलेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि लावणीची परंपरा समृद्ध केली. त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान आणि त्यांनी साकारलेल्या भूमिका रसिकांच्या स्मरणात कायम राहतील. मधू कांबीकर यांच्या निधनाने मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रातील एक ज्येष्ठ, प्रतिभावंत आणि अस्सल कलावंत हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. मधू कांबीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली, अशी भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली.

मुंबईसह महाराष्ट्राच्या विकासासाठी ब्लूमबर्गसोबतची भागीदारी महत्वपूर्ण ठरणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई आणि न्यूयॉर्क या शहरांमध्ये अनेक समान वैशिष्ट्ये आहेत. मुंबईसह महाराष्ट्राच्या विकासासाठी ब्लूमबर्गसोबतची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या सहकार्यामुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल. ही भागीदारी परिवर्तन घडवून आणणारी आणि ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच भारताची आर्थिक, व्यावसायिक आणि मनोरंजनाची राजधानी असलेल्या मुंबईत ब्लूमबर्गचे माईक ब्लूमबर्ग यांचे स्वागत करताना त्यांनी महाराष्ट्रातील ब्लूमबर्गच्या योगदानाचे कौतुक केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ब्लूमबर्गचे माईक ब्लूमबर्ग यांची मुंबईतील हॉटेल सेंट रेजिस येथे भेट घेतली. यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी मुंबई महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ ढवसे यांच्यासह उद्योग क्षेत्रातील नामवंत उद्योजक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ब्लूमबर्गने भारतात ३० वर्षे पूर्ण केली असून या प्रवासात महाराष्ट्राचे विशेष स्थान आहे. ब्लूमबर्गचे मुख्यालय महाराष्ट्रात असून, मुंबई आणि पुणे येथेही कंपनीची कार्यालये आहेत, ही अभिमानाची बाब आहे. पुण्यात संशोधन, विकास आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ ब्लूमबर्ग टर्मिनल्सच्या निर्मितीसाठी कार्यरत आहेत. माईक ब्लूमबर्ग यांच्याशी आपली २०१४ मध्ये झालेली पहिली भेट आणि २०१८ मध्ये त्यांच्या कार्यालयाला दिलेली भेट आजही स्मरणात



असल्याचे सांगत, त्यांनी केलेले स्वागत आणि त्यांच्याशी झालेला संवाद हा शिकण्याचा अनुभव होता, असेही मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्र शासन आणि ब्लूमबर्ग यांच्या भागीदारीतून रस्ते सुरक्षा, आरोग्यविषयक माहिती व्यवस्था, निरोगी शहरे आणि प्रशासनातील नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळत आहे. मुंबई, पुणे आणि नाशिक येथे या क्षेत्रांत विविध उपक्रम राबविण्यात येत असून, त्यासाठी ब्लूमबर्गने दिलेल्या सहकार्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी आभार मानले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईत मेट्रोचे जाळे केवळ ११ किलोमीटर होते; आता सुमारे ३५० किलोमीटरचे मेट्रो जाळे विकसित केले जात आहे. त्यापैकी १०० किलोमीटरचे मार्ग कार्यान्वित झाले असून, पुढील वर्षापर्यंत आणखी ७० किलोमीटरचे मार्ग सुरू करण्याचे नियोजन आहे. २०२९-३० पर्यंत संपूर्ण मेट्रो जाळे कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून देशातील अनेक शहरांमध्ये वाहतूक व्यवस्थेचा विस्तार होत असून, पुण्यातही मेट्रोचे विस्तृत जाळे विकसित केले जात आहे. द्वितीय श्रेणीतील शहरांमध्ये सार्वजनिक वाहतुकीच्या वापराला प्रोत्साहन दिल्यास नागरिकांच्या वर्तनात सकारात्मक बदल घडू शकतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र हे देशातील महत्त्वाचे आर्थिक राज्य असून, भारतात व्यवसायाची ३० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त करत, मुंबईने व्यवसायाच्या विस्तारात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचे मायकल ब्लूमबर्ग यावेळी म्हणाले. भारतात व्यवसाय सुरू केला, तेंव्हा छोट्याशा सामायिक जागेतून कामकाजाला सुरुवात झाली होती, मात्र आज भारतातील व्यवसायाचे मुख्यालय मुंबईत आहे. मुंबईसह देशभरात कंपनी सातत्याने गुंतवणूक करत असून, पुण्यात १०० हून अधिक अभियंते कार्यरत आहेत. पुण्यात उभारण्यात येत असलेल्या अभियांत्रिकी केंद्राचा भविष्यात आणखी विस्तार करण्याची योजना आहे. कंपनीची भारताप्रती असलेली बांधिलकी केवळ व्यवसायापुरती मर्यादित नसून, गेल्या जवळपास २० वर्षांपासून सार्वजनिक आरोग्य, रस्ते सुरक्षा, स्वच्छता आणि स्वच्छ ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांतील विविध उपक्रमांना सहकार्य केले जात आहे. भारतासह महाराष्ट्र राज्यात मिळालेल्या यशाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करीत, येथील नागरिकांसाठी उपयुक्त उत्पादने विकसित करण्यासाठी यापुढेही प्रयत्नशील राहणार असल्याचे ते म्हणाले.

विरोधकांचा न्यायव्यवस्थेवर विश्वासच नाही!

मुख्यमंत्री फडणवीसांचा सवाल : सुप्रीम कोर्टावर मोर्चा नेऊन सरन्यायाधीशांना भेटायला सांगणे कुठल्या संविधानात लिहिलेय?

■ मुंबई (दै. संध्या)

"सर्वोच्च न्यायालयावर थेट मोर्चा काढून देशाच्या सरन्यायाधीशांनी मोर्चाला सामोरे जावे किंवा त्यांना भेटावे, अशी मागणी करणे अत्यंत हास्यास्पद आणि धक्कादायक आहे. सतत संविधानाच्या गप्पा मारणाऱ्या विरोधकांनी आधी सांगावे की हे देशाच्या कोणत्या संविधानात लिहिले आहे? जर तुम्हाला काही तक्रार असेल तर कायदेशीर मार्गाने न्यायालयात या आणि लढा. स्वतःचे संविधानिक कर्तव्य बजावत सरन्यायाधीशांनी मोर्चाला भेटण्यास नकार दिला, तर त्यांच्याविरोधात खालच्या पातळीवर भाषा वापरली जात आहे. देशातील स्वायत्त आणि न्यायिक संस्थांना बदनाम करण्याचे आणि जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडवण्याचे हे विरोधकांचे पूर्वनियोजित षड्यंत्र आहे," असा पलटवार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. नवी दिल्लीत निवडणूक आयोगाच्या विरोधात आणि मतदार पुनरीक्षणाच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' आघाडीने



काढलेला सर्वोच्च न्यायालयावरील मोर्चा आणि सरन्यायाधीशांच्या भेटीवरून सुरू असलेल्या राजकीय वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत माध्यमांशी बोलताना विरोधकांचा समाचार घेतला. विरोधी पक्षांच्या कार्यपद्धतीवर आणि भूमिकेवर आश्चर्य व्यक्त करताना मुख्यमंत्री म्हणाले, "विरोधी पक्षनेते अशी मागणी कशी काय करू शकतात, याचे मला आश्चर्य वाटते. आम्ही सुप्रीम कोर्टावर मोर्चा काढणार आणि सरन्यायाधीशांनी आम्हाला भेटलेच पाहिजे, असा हट्ट धरणे कोणत्या लोकशाही संकेतात बसते? सरन्यायाधीश कधी अशा कोणत्याही राजकीय मोर्चाला सामोरे जातात का?" विरोधकांच्या एकंदर रणनीतीवर ताशेरे ओढताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले. "जेव्हा देशातील जनता विरोधकांना नाकारते, तेव्हा ते निवडणूक आयोग, संसद आणि आता थेट सर्वोच्च न्यायालयासारख्या सर्वोच्च न्यायिक संस्थांवर चिखलफेक करायला सुरुवात करतात. देशातील प्रमुख संस्थांचे खच्चीकरण करणे आणि सामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरून विश्वास उडवणे, हेच यामागील खरे षड्यंत्र आहे."

कोर्टात या आणि कायदेशीर लढा

"सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका 100 टक्के कायदेशीर आणि योग्य आहे. जर विरोधकांना कोणतीही तक्रार असेल, तर संविधानाने न्यायालयीन प्रक्रियेचा मार्ग आखून दिला आहे. तिथे याचिका दाखल करा आणि कोर्टात आपली बाजू मांडा. अशा प्रकारे रस्त्यावरून न्यायालयात घुसण्याचा प्रयत्न करणे म्हणजे दबाव आणण्याचा प्रकार आहे." सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर विरोधी नेत्यांकडून होणाऱ्या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीस अत्यंत आक्रमक झाले. "सरन्यायाधीशांनी आपले संविधानिक कर्तव्य बजावताना अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले की, 'मी कोणत्याही राजकीय मोर्चाला भेटू शकत नाही.' त्यांचा हा निर्णय कायद्याला धरून होता. मात्र, नकार मिळताच त्यांच्याविरोधात अत्यंत अश्लाघ्य, हीन आणि खालच्या पातळीवर टीकाटिप्पणी सुरू झाली. मी वारंवार जे सांगत आलो आहे, तेच आज पुन्हा सिद्ध झाले. या लोकांचा देशाच्या संविधानावर, कायद्याच्या राज्यावर आणि लोकशाहीवर काडीमात्र विश्वास नाही. हे पूर्णपणे संविधानविरोधी लोक आहेत."

आनंद दुबे यांचा उबाठाला जय महाराष्ट्र!

शर्जील इमाम, उमर खालिद अन् ध्रुव राठी माझे नेते होऊ शकत नाहीत; ज्या डब्यात कॉकरोच शिरले तो डबा सोडला!

■ मुंबई (दै. संध्या)

सध्या विविध आंदोलनांनी राजकारण ढवळून निघालेले असताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मुंबईत मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे प्रमुख प्रवक्ते आणि आक्रमक उत्तर भारतीय चेहरा म्हणून ओळखले जाणारे नेते आनंद दुबे यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. "गेल्या अनेक वर्षांपासून ज्या पक्षासाठी तन-मन-धनाने काम केले, तिथे आता डास, माश्या, पाली आणि झुरळांसारख्या उपद्रवी घटकांनी कब्जा केला आहे. शर्जील इमाम, उमर खालिद किंवा ध्रुव राठीसारखे लोक माझे नेते कधीच होऊ शकत नाहीत. सनातन धर्माचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अपमान करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्यापेक्षा मी मरण पत्करेन," अशी अत्यंत संतप्त टीका आनंद दुबे यांनी राजीनाम्यानंतर माध्यमांशी बोलताना केली. आपल्या राजीनाम्याची सविस्तर पार्श्वभूमी सांगताना आनंद दुबे म्हणाले, "मी अत्यंत दुःखी मनाने हा निर्णय घेतला आहे. 2024ची लोकसभा असो, 2024ची विधानसभा असो किंवा 2026ची मुंबई महानगरपालिका निवडणूक असो; पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी स्टार प्रचारक म्हणून आणि टीव्ही



डिबेट्सच्या माध्यमातून मी प्रामाणिकपणे पार पाडली. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून पक्षाची जी दिशा आणि भूमिका झाली आहे, तिच्याशी मी स्वतःला जुळवून घेऊ शकत नाही." "माझे नेते भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव आहेत. मी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांना आदर्श व दैवत मानणारा कार्यकर्ता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर माझे हिरो आहेत; मात्र आघाडीतील घटक पक्ष उघडपणे सावरकरांना शिव्यांची लाखोली वाहतात. काही लोक सनातन धर्माची तुलना 'डेंग्यू'शी करतात, तर काही प्रभू श्रीराम आणि भगवान शंकरामध्ये भेदभाव निर्माण करतात. अशा विकृत आणि अराजक वातावरणात मी गप्प राहू शकत नाही."

संपादकीय

पाणी वाचवा महाराष्ट्र वाचवा

आज थेंब जपला नाही तर उद्या अश्रूंनाही पाणी उरणार नाही!

निसर्गाने ऑक्टोबरमध्येच धोक्याचा रेड अलर्ट दिलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने डोळे उघडे ठेवले नाहीतर भविष्यात अश्रू ढाळायलाही पाणी उरणार नाही! जरा दोन मिनिटे तुमचा हातातला मोबाईल बाजूला ठेवा आणि शांतपणे विचार करा.

नेहमी आपले काय ठरलेले असते? दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यात नळाला पाणी कमी आले, विहिरी आटल्या की आपण दोन महिने आरडाओरडा करतो. व्हॉट्सॲपवर स्टेटसला दुःखाचे मेसेज ठेवतो, न्यूज चॅनेल्सवर टँकरच्या रांगा बघून हळहळतो आणि जूनमध्ये पहिला पाऊस पडला की डोक्यावर हात ठेवून सगळे विसरून जातो!

पण या वर्षी निसर्गाने भयानक संकट महाराष्ट्रात आणलेले आहे. पावसाने दडी मारलेली आहे. निसर्गाच्या सान्निध्यात असणारा महाराष्ट्र होरपळून निघायला सुरूवात झाली आहे.

आत्ता आकाशात ढग आहेत, कधीतरी पावसाची सर येतेय, म्हणजे अधिकृतपणे पावसाळा अजून संपलेलाही नाही.आणि आत्ताच, ऑक्टोबर २०२६ मध्येच, आपल्या महाराष्ट्राच्या छाताडावर ७५% पाणीटंचाईचे भयानक भूत येऊन बसले आहे!

अजून उन्हाळा यायचा बाकी आहे.जरा शांतपणे बोटांवर मोजा आणि कॅलेंडरचा हा हिशोब बघा ऑक्टोबर (पावसाळा संपतानाच कोरड!)

नोव्हेंबर (थंडीची सुरुवात, पण धरणात पाणी नाही) डिसेंबर (गुलाबी थंडी, पण चिंतेचे ढग)

जानेवारी २०२७ (नवीन वर्षाची सुरुवात टंचाईने) फेब्रुवारी (विहिरींची पातळी खाली) मार्च (उन्हाचा चटका आणि पाण्याचा टंचाईचा झटका) एप्रिल (रखरखते उन्हाळे आणि टँकरची वाट) मे (पाण्याच्या एका-एका थेंबासाठी जीवन-मरणाचा संघर्ष!)

सलग ८ महिने... म्हणजेच तब्बल २४० दिवस!

विचार करा, हे पुढील आठ महिने आपण कसे काढणार आहोत? आठ महिने म्हणजे काही लहान सहान काळ नाही. पाणी काही फॅक्टरीतल्या मशिनमध्ये बनत नाही की ऑर्डर दिली आणि तयार झाले!असे होत नाही. हे सगळे जाणून आहेत. सर्वात मोठा भ्रम डोक्यातून काढून टाका की दुष्काळ हा फक्त शेतकऱ्यांचा विषय आहे, आपला काय संबंध? शेतकरी जगला तरच आपण जगू! शेतात धान्यच पिकले नाही, तर शहरातल्या अलिशान मॉलमधून किंवा एसी सुपरमार्केटमधून काय प्लास्टिक आणि सिमेंट खाणार का? धरणात पाणी नसेल तर शहरातल्या १० व्या मजल्यावरील फ्लॅटच्या नळालाही पाणी येणार नाही. सोसायट्यांमध्ये टँकरचे दर गगनाला भिडतील, कारखाने बंद पडतील, हाताला काम उरणार नाही आणि रोजचे जगणे असह्य होईल. दुष्काळाची ही झळ तुमच्या-माझ्या घराच्या चुलीपर्यंत आणि थेट ताटापर्यंत पोहोचणार आहे!

म्हणूनच, नेहमीप्रमाणे फक्त गप्पा मारून किंवा फेसबुक-व्हॉट्सॲपवर हळहळ व्यक्त करून काहीही होणार नाही. आपल्या सर्वांसाठी काही 'छोटे, सोपे पण अत्यंत कडक उपाय!..हे उपाय आज, आत्ता आणि याच क्षणापासून आपल्या घरात आणि दैनदिन जीवनात लागू केले पाहिजे पाणी वाचवण्याचे उपायाची अमलबजावणी लगेच सुरु करण्याची आवश्यकता आहे.

आपल्याकडे घरी पाहुणा आला की आपण आदरातिथ्य म्हणून तांब्या भरून किंवा मोठा फुल ग्लास पाणी देतो. पाहुणा त्यातले दोन घोट पितो आणि उरलेले पाऊण ग्लास पाणी सरळ बेसिनमध्ये ओतून दिले जाते. इथून पुढे घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुरुवातीला अर्धाच ग्लास पाणी देऊयात. नम्रपणे सांगूया, "पाणी मौल्यवान आहे, तुम्हाला अजून हवे असेल तर नक्की सांगा." पाहुणाही खूश आणि उरलेले हजारो लिटर पाणी वाया जाण्यापासून वाचेल.'एक बादली' चॅलेंज (शॉवर ला कायमची गोळी मारूया!):

शॉवरखाली उभे राहून मस्त गाणी गात आंघोळ करताना किती शेकडो लिटर पाणी वाहून जाते, याचा आपल्याला अंदाजच येत नाही. पुढील आठ महिने शॉवर पूर्णपणे बंद! फक्त एक बादली आणि एक तांब्या. एका माणसाच्या आंघोळीमागे रोज किमान ३० ते ४० लिटर पाणी वाचते. घरात ४ माणसे असतील तर रोज १५० लिटर पाण्याचे नेट सेव्हिंग होईल.

आपल्या घरातील वॉटर प्युरिफायर (RO) १ लिटर पिण्याचे पाणी शुद्ध करण्यासाठी तब्बल ३ लिटर वेस्ट पाणी बाहेर टाकून देतो. आपण ते पाणी पाईपद्वारे थेट बेसिनमध्ये सोडून देतो. त्या वेस्ट पाण्याचा पाईप एका मोठ्या कॅनमध्ये किंवा बादलीत सोडून ते पाणी अजिबात घाण नसते! ते पाणी फरशी (पोछा) पुसण्यासाठी, भांडी घासण्यासाठी, कपडे धुण्यासाठी किंवा संडासच्या फ्लशसाठी वापरता येईल

सकाळी ब्रश करताना किंवा दाढी करताना नळ धोधो चालू ठेवण्याची अनेकांना सवय असते शेव्हिंग करताना एका मगमध्ये पाणी घ्या. ब्रश करताना दात घासेपर्यंत नळ पूर्ण बंद ठेवा, फक्त तोंड धुण्याच्या वेळीच नळ चालू करा. या एका छोट्या सवयीने कुटुंबाचे रोज ५० लिटर पाणी वाचवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होईल.

सकाळी उठून पाईप लावून धोधो पाण्याने गाडी धुणे म्हणजे सध्याच्या परिस्थितीत पाण्याचा खून करण्यासारखे आहे.

आपली वाहने धुण्यासाठी पाईप वापरणे पूर्ण बंद करणे आठवड्यातून एकदा किंवा दोनदा एका लहान बादलीत पाणी घेऊन ओल्या फडक्याने आपली वाहने पुसून घ्यावीत. आपली वाहने थोडी कमी चमकली तरी चालेल पण निसर्गाचे आणि आपले भविष्य नक्कीच चमकून निघेल.

घरात आई, बायको किंवा बहीण भाजी धुते, तांदूळ-डाळ धुते, ते पाणी आपण थेट बेसिनच्या गटारात सोडून देतो. स्वयंपाकघरात भाजी आणि धान्य धुतलेले पाणी एका वेगळ्या घमेल्यात साठवून ते पोषक पाणी गच्चीवरील किंवा गॅलरीतील कुंडीतल्या झाडांना घाला. झाडांना नैसर्गिक खत-पाणी मिळेल आणि आपले नळाचे अनमोल पाणी वाचेल.

आपल्या घरातील किंवा इमारतीतील नळातून जर 'टिप-टिप' पाणी गळत असेल, तर आपण "अरे जाऊ दे, थेंबच तर गळतोय" म्हणून दुर्लक्ष करतो .तो एक-एक थेंब २४ तासांत अख्खी २० लिटरची बादली भरतो! आजच प्लंबरला बोलावून आणि घरातील सर्व गळती बंद करून घ्या. प्लंबर मिळेपर्यंत त्या नळाखाली एखादे भांडे ठेऊन, ते साठलेले पाणी वापरात आणले पाहिजेत.

आपण एकदा फ्लश केला की टँकमधून थेट ८ ते १० लिटर पाणी वाहून जाते. प्लास्टिकच्या १ लिटरच्या बाटलीत पाणी किंवा वाळू भरा, तिचे झाकण कडक लावा आणि ती बाटली तुमच्या फ्लश टँकच्या आत ठेवून द्या. यामुळे प्रत्येक वेळी फ्लश करताना १ लिटर पाणी कमी वापरात येईल आणि टँकचे कामही होईल! सगळ्या माता भगिनी. आणि

मित्रांनो, निसर्गाने आपल्याला यंदा वेळेच्या आधीच कडक इशारा दिला आहे. अजूनही आपल्याकडे वेळ आहे. हे उरलेले पावसाचे दिवस आणि येणारे आठ महिने जर आपण संयमाने आणि युक्तीने पाणी वापरले, तरच आपण या संकटातून सहीसलामत बाहेर पडू शकू.नाही तर कठीण काळाला सामोरे जावे लागेल.

पाणी हे दुकानात विकत मिळणारी साधी बाटली नाही, तर ते 'आपले आणि आपल्या मुलांचे आयुष्य म्हणजेच जीवन ' आहे.याची सगळ्यानी दक्षता घ्यावी. ते गरजेचे आहे. "आज जर पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला नाही, तर उद्या पश्चात्तापाचे अश्रू ढाळायलाही डोळ्यात पाणी उरणार नाही!"

पाणी वाचवा... महाराष्ट्र वाचवा

प्रस्तावित असलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करावा

■ लोणी काळभोर (दै. संध्या)



थेऊर हे धार्मिक, आध्यात्मिक व ऐतिहासिक महत्त्व असलेले ठिकाण असून, येथे वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ असते. अशा पवित्र तीर्थक्षेत्राच्या परिसरात प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आल्यास परिसरातील स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण, हवेची गुणवत्ता तसेच देवस्थानाच्या धार्मिक वातावरणावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. कचरा प्रक्रिया प्रकल्पामुळे दुर्गंधी, वाहतुकीची वर्दळ, प्रदूषण आणि इतर नागरी समस्या निर्माण होण्याची भीती ग्रामस्थ व भाविकांमध्ये आहे.त्यामुळे

श्रीक्षेत्र थेऊर येथे प्रस्तावित असलेला कचरा प्रक्रिया प्रकल्प अन्यत्र स्थलांतरित करावा अशी मागणी हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे व थेऊरच्या ग्रामस्थांनी शिरूर हवेलीचे आमदार माऊली आबा कटके यांच्याकडे केली आहे. श्रीक्षेत्र थेऊर, ता. हवेली येथे अष्टविनायकातील दुसरा व मानाचा गणपती असलेले श्री. चिंतामणी गणपती देवस्थान आहे. हा गणपती भक्तांची चिंता दूर करणारा गणपती म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच पुणे शहरापासूनचा एकमेव सर्वात जवळचा गणपती आहे. यामुळे येथे वर्षाकाठी तब्बल २० ते २५ लाख भाविकभक्त दर्शनाच्या निमित्ताने भेट देतात. तसेच गावची लोकसंख्याही २० हजार आहे. थेऊर येथे येणाऱ्या लाखो भाविकांच्या धार्मिक भावना, ग्रामस्थांचे आरोग्य आणि परिसराचे पावित्र्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अशा प्रकारचा प्रकल्प श्रीक्षेत्र थेऊर येथे उभारणे योग्य ठरणार नाही, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे.

तरी आमदार माऊली कटके यांनी या गंभीर विषयात वैयक्तिक लक्ष घालून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करावी. प्रस्तावित कचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणाची फेरतपासणी करून हा प्रकल्प श्रीक्षेत्र थेऊर येथून अन्य योग्य ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून या प्रस्तावाबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी आमदार माऊली आबा कटके यांनी सांगितले की कचऱ्याच प्रश्न गंभीर असला तरी स्थानिक नागरिकांच्या भावना लक्षात घेऊनच प्रकल्पाबाबत निर्णय घेतला जाईल . कोणत्याही गावावर अन्याय केला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पंचनामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे कृषी विभागाचे निर्देश

बाधित शेतकरी वंचित राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना

■ बारामती (दै. संध्या)



दौंड तालुक्यातील मौजे बोरीऐंदी, सहजपूर व ताम्हणवाडी येथे दुष्काळामुळे बाधित झालेल्या सोयाबीन व बाजरी पिकांची जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी क्षेत्रीय पाहणी केली. यावेळी त्यांनी पीक पंचनाम्यांच्या कामाचा आढावा घेतला आणि पंचनामे विहित मुदतीत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित कृषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

दौंड तालुक्यात 'ट्रिगर १' लागू झाल्यामुळे तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झालेल्या एकाही बाधित शेतकऱ्याला पंचनाम्यापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना श्री. तांबे यांनी दिल्या. तसेच पाहणीदरम्यान बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

या क्षेत्रीय पाहणीमुळे पीक नुकसान पंचनाम्यांच्या कामाला गती मिळण्यास मदत होणार असून, सर्व बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीची नोंद विहित प्रक्रियेनुसार पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. यावेळी यवत मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप, उपकृषी अधिकारी संतोष मोरे, सहायक कृषी अधिकारी पंढरीनाथ कुतवळ, शैलेश मोरे, विनायक जगताप, सूरज बाबर यांच्यासह परिसरातील बाधित शेतकरी उपस्थित होते.

फळपीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

■ बारामती (दै. संध्या)

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार सन २०२६- २७ करिता द्राक्ष, मोसंबी, केळी, पपई, नारळ, संत्रा, अंजीर, आंबा व डाळिंब या पिकांसाठी सहभागी होण्यासाठी https://www.pmfby.gov.in या राष्ट्रीय पीक विमा पोर्टलवर विहित मुदतीत अर्ज करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. ही योजना पुणे जिल्ह्यात भारतीय कृषि विमा कंपनी लि. मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी द्राक्ष पिकासाठी १५ ऑक्टोबर, केळी, मोसंबी, पपई, नारळ पिकासाठी ३१ ऑक्टोबर, संत्रा, अंजीर पिकासाठी ३० नोव्हेंबर, आंबा पिकासाठी ३१ डिसेंबर २०२६ व डाळिंब पिकासाठी १४ जानेवारी २०२७ याप्रमाणे अंतिम मुदत राहील. ही योजना कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी ऐच्छिक आहे. या योजनेत गारपीट या हवामान धोक्यासाठीचा सहभाग ऐच्छिक असून त्यासाठी अतिरिक्त विमा हप्ता आहे. कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभागी होणार आहेत किंवा नाही याबाबत घोषणापत्र अंतिम मुदतीच्या सात दिवस अगोदर भरुन देणे आवश्यक राहील.

स्व. आ. सुरेशभाऊ गोरे स्मृती व्याख्यानमालेची सांगता

■ चाकण (दै. संध्या)



खेड तालुक्याचे आमदार व शिक्षण संस्थेचे संस्थापक स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या स्मृती दिनानिमित्त स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे चाकण येथील ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मीडियम स्कूल व स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज मध्ये सलग तीन दिवस सुरू असलेल्या स्व.आ. सुरेशभाऊ गोरे स्मृती व्याख्यानमालेची विविध उपक्रमांनी उत्साहात सांगता करण्यात आली.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व गटनेते नितीन गोरे यांच्या नेतृत्वाखाली सलग तीन दिवस ही व्याख्यानमाला सुरू होती. या व्याख्यानमालेत सर्पमित्र शरद गुंड यांनी " सर्प विषयक समज व गैरसमज आणि अध्यात्म आणि विज्ञान " या विषयावर पहिले पुष्प गुंफले. एड. महेश लोहारे यांनी " करिअरच्या वाटा आणि सायबर सुरक्षितता " या विषयावर दुसरे पुष्प गुंफले. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते राजेंद्र दीक्षित यांनी " सोशल मीडियाचा वापर कसा आणि किती करावा " या विषयावर अखेरचे पुष्प गुंफले. व्याख्यानमालेत व्याख्यात्यांनी स्व.आ. सुरेश भाऊ गोरे यांच्या कार्याचा गौरव करून आठवणींना उजाळा दिला.

उदघाटन प्रसंगी पोलीस निरीक्षक दीपक गोसावी, अधीक्षक डॉ. सचिन कांबळे, मंडलधिकारी चेतन चासकर, ओंकार गोरे, ज्ञानेश्वर सातव, नारायण करपे, विजयकुमार तांबे, मनोहर शेवकरी, शाम राक्षे, अमृत धाडगे आदींची प्रमुख उपस्थिती होती. ज्ञानवर्धिनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रमिला गोरे यांनी सांगितले की," स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रशालेतील शिक्षक व विद्यार्थी यांच्या सहभागातून जमा करण्यात आलेले मूठभर धान्य, जीवनोपयोगी साहित्य, एक हजार किलो गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, कडधान्य अनाथ आश्रम व वृद्धाश्रमात मदत म्हणून देण्यात आले.

भामा स्कुलच्या प्रिन्सिपल माधुरी गोरे, ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य सचिन आभाळे, प्रेरणा काळे, लिना चौधरी, ज्योती अनाप, सिद्धार्थ मळेवाडी, नितीन शिंदे, सुवर्णा चौधरी, स्वाती गाडे, दत्तात्रय लिंभोरे, सुनिल वडेकर आदींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

अण्णासाहेब नवरे तांत्रिक शिक्षण केंद्रात शारदोत्सवाला प्रारंभ

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाच्या अण्णासाहेब नवरे तांत्रिक शिक्षण केंद्र, नारायणगाव येथे प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्यामध्ये संस्कारक्षम शिक्षणाची रुजवणूक व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात येणाऱ्या शारदीय नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला. ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर व त्यावेळचे या विभागाचे प्रमुख रविंद्र पारगावकर यांच्या संकल्पनेतून सन १९९३-१९९४ मध्ये सुरू झालेला हा उपक्रम गेली ३२ वर्षे संस्थेत अखंडपणे सुरू आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विद्यासागर माळी यांनी केले. या उत्सवादरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि व्यक्तिमत्त्व विकासविषयक उपक्रम राबविण्यात येतात. शारदोत्सवाच्या पहिल्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी विद्यार्थी आणि उद्योजक गणेश दौंडकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बदलत्या काळानुसार स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे, नवनवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि समाजात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले. मोठ्या उद्योगांमध्ये किंवा नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी करण्याचे ध्येय ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी स्वतःचा छोटा का होईना, पण व्यवसाय किंवा उद्योग उभारण्याचा प्रयत्न करावा.

वाहतुकीला शिस्त नाही, तर कोंडीला अंतच नाही!



• वाहतूक शिस्त • नागरिकांची जबाबदारी • सुरक्षित प्रवास •

मा. सुनील सुंदराबाई धाऊ झळके, भिवंडी 9860290353

■ (दै. संध्या)

रस्त्यावर वाहन चालवताना प्रत्येकाला पुढे जायचे असते; मात्र दुसऱ्याला सुरक्षितपणे पुढे जाऊ द्यायचे असते, याचा विसर पडतो. पुढील वाहनाला खेटून गाडी चालवणे, चुकीच्या बाजूने मार्ग काढणे, सिग्नल मोडणे आणि रस्त्यावरच वाहने उभी करून इतरांचा मार्ग अडवणे, ही बेशिस्त वाहतुकीची काही ठळक उदाहरणे आहेत. परिणामी, वाहतूक कोंडी वाढते, वेळ वाया जातो आणि अपघातांचा धोका निर्माण होतो.

रस्ते अरुंद की वाहनचालकांची मानसिकता?

अनेक शहरांमध्ये रस्ते आधीच अरुंद आहेत. त्यात बेकायदेशीर पार्किंग, रस्त्यावरील अतिक्रमणे, दुकानांसमोर उभ्या केलेल्या गाड्या आणि माल चढवण्या-उतरवण्यासाठी अडवलेले रस्ते यांमुळे वाहतुकीसाठी उपलब्ध जागा कमी होते. काही वाहनचालक रस्त्याच्या मधोमध किंवा चौकाजवळ वाहने उभी करून निघून जातात. परिणामी, इतर वाहनचालकांना मार्ग काढण्यासाठी कसरत करावी लागते.

बोनट टू बोनट गाड्या, घाई मात्र जीवावर बेतणारी!

वाहतूक कोंडीत पुढील वाहनापासून सुरक्षित अंतर न ठेवणे, दोन वाहनांमधून जबरदस्तीने पुढे जाणे, चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करणे आणि लेनची शिस्त मोडणे यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो. सायकलस्वार, दुचाकीस्वार, तीनचाकी आणि चारचाकी चालक अशा सर्वांनी नियम पाळणे आवश्यक आहे.

वाहन चालवताना निर्धारित वेगमर्यादा पाळणे, सिग्नलचे पालन करणे, सुरक्षित अंतर राखणे, योग्य लेनमध्ये राहणे, हेल्मेट व सीटबेल्ट वापरणे, मद्यपान करून वाहन न चालवणे आणि वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी सुरक्षित मार्ग देणे आणि रुग्णवाहिकेसारख्या आपत्कालीन वाहनांना मार्ग मोकळा करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

चूक दाखवली तरी वाद कशासाठी?

एखाद्या वाहनचालकाला नियम समजावून सांगितल्यास काही जण चूक सुधारण्याऐवजी वाद, शिवीगाळ किंवा मारामारी करतात. वाहतुकीतील बेशिस्तीबरोबरच ही असहिष्णु मानसिकताही चिंताजनक आहे. नियम मोडणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांनी निष्पक्ष कारवाई करावी; मात्र प्रत्येक ठिकाणी पोलीस उपस्थित राहू शकत नसल्याने नागरिकांनीही स्वयंशिस्त पाळणे आवश्यक आहे.

प्रशासन आणि नागरिकांची संयुक्त जबाबदारी

वाहतूक कोंडीसाठी केवळ वाहनचालकांना दोष देणे योग्य ठरणार नाही. अपुरी पार्किंग व्यवस्था, वाढती वाहनसंख्या, अतिक्रमणे, अरुंद रस्ते आणि वाहतुकीचे अपुरे नियोजन यांवरही प्रशासनाने उपाययोजना करणे गरजेचे आहे. अधिकृत पार्किंगची सुविधा, स्पष्ट वाहतूक चिन्हे, नो-पार्किंग क्षेत्रांवरील प्रभावी अंमलबजावणी आणि गर्दीच्या ठिकाणी योग्य वाहतूक नियोजन यांना प्राधान्य दिले पाहिजे.

त्याचबरोबर नागरिकांनीही रस्त्यावर मनमानी करणे थांबवले पाहिजे. सार्वजनिक रस्ता हा कोणाच्या वैयक्तिक मालकीचा नसून सर्वांच्या सुरक्षित प्रवासासाठी आहे. त्यामुळे स्वतःच्या सोयीसाठी दुसऱ्याचा मार्ग अडवणे म्हणजे सार्वजनिक हक्कांवर अतिक्रमण करण्यासारखे आहे.

वाहतुकीची खरी शिस्त दंडाच्या भीतीतून नव्हे, तर जबाबदारीच्या जाणिवेतून निर्माण झाली पाहिजे. शेवटी, रस्त्यावर सर्वांत आधी पोहोचणे ही यशाची कसोटी नाही; तर स्वतःसह इतरांनाही सुरक्षितपणे घरी पोहोचू देणे हीच खरी जबाबदारी आहे. रस्त्यांची व्यवस्था सुधारण्याइतकीच वाहनचालकांची मानसिकता सुधारणेही आवश्यक आहे. घाईने रस्ता जिंकता येईल; पण शिस्तीने जीवन सुरक्षित होईल !

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

डीपीयू हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी महिलेला दिली नवसंजीवनी!

■ डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी २७ वर्षीय महिलेचे निकामी फुप्फुस केले पुन्हा कार्यान्वित!

■ ब्रिटनमध्ये 'अशक्य' ठरलेले उपचार पिंपरीत यशस्वी

डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये गुंतागुंतीचे श्वसनमार्गाचे विकार, फुप्फुस विकार, क्षयरोगानंतर निर्माण होणाऱ्या गुंतागुंती आणि इतर श्वसनविकारांसाठी प्रगत निदानात्मक आणि उपचारात्मक ब्रॉन्कोस्कोपी सेवा उपलब्ध आहेत. यासोबतच, अंतिम टप्प्यातील आणि अपरिवर्तनीय फुप्फुसांच्या आजारांसाठी फुप्फुस प्रत्यारोपण सेवांसह अत्याधुनिक फुप्फुसविषयक वैद्यकीय उपचार रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

■ पुणे (दै. संध्या)

DPU SUPER SPECIALTY HOSPITAL (A Unit of Dr. D.Y. Patil Medical College, Hospital & Research Centre) PIMPRI, PUNE

डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी येथील फुप्फुसरोग तज्ज्ञांनी (पल्मोनोलॉजिस्ट्स) एका २७ वर्षीय महिलेच्या पूर्णपणे अकार्यक्षम (कोलॅप्स) झालेल्या फुप्फुसाचे कार्य यशस्वीरीत्या पूर्ववत करण्यात यश आले आहे.. या महिलेची प्रकृती कधीही सुधारू शकत नाही आणि तिला कायमस्वरूपी याच स्थितीसह जगावे लागेल, असा सल्ला तिला यापूर्वी देण्यात आला होता. रुग्णाला फुप्फुसाचा क्षयरोग (टीबी) झाल्याचे निदान झाले होते आणि तिने सुमारे नऊ महिन्यांचे क्षयरोगविरोधी (अँटी-ट्यूबरक्युलर) उपचार पूर्ण केले होते. संसर्ग यशस्वीरीत्या बरा झाला असला, तरी त्यामुळे तिच्या डाव्या फुप्फुसाच्या श्वसनमार्गावर गंभीर स्वरूपाच्या जखमा (स्कारिंग) राहिल्या होत्या. काळाच्या ओघात, या जखमांच्या उतींमुळे (स्कार टिश्यूज) डावी मुख्य ब्रोन्कस म्हणजेच फुप्फुसात हवा वाहून नेणारी मुख्य नलिका हळूहळू अरुंद होत गेली आणि शेवटी पूर्णपणे बंद झाली.

याचा परिणाम म्हणून, तिचे संपूर्ण डावे फुप्फुस अकार्यक्षम (कोलॅप्स) झाले, ज्यामुळे तिला तीव्र श्वासोच्छवासाचा त्रास सुरू झाला आणि तिच्या दैनंदिन आयुष्यावर गंभीर परिणाम झाला. नुकसानाचे प्रमाण प्रचंड असल्याने, काही वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते हे फुप्फुस कायमस्वरूपी अकार्यक्षम झाले होते. या वैद्यकीय स्थितीला बहुधा "ऑटोन्यूमोनेक्टॉमी" (Autopneumonectomy) म्हटले जाते, जिथे तीव्र आजार आणि जखमांमुळे फुप्फुस एखाद्या शस्त्रक्रियेने काढून टाकल्यासारखेच पूर्णपणे निष्क्रिय होते.

अधिक वैद्यकीय मत जाणून घेण्यासाठी रुग्णेने डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजी विभागाशी संपर्क साधला. या पथकाचे नेतृत्व डॉ. राहुल केंद्रे यांनी केले. सखोल तपासणीनंतर, श्वसनमार्गातील अडथळा सुरक्षितपणे दूर केल्यास हे अकार्यक्षम झालेले फुप्फुस पुन्हा पूर्ववत होऊ शकते, असे तज्ज्ञांच्या लक्षात आले. एका अत्यंत विशेष 'ब्रोन्कोस्कोपी' प्रक्रियेदरम्यान, डॉक्टरांच्या टीमला डाव्या मुख्य ब्रोन्कसचे प्रवेशद्वार जखमांच्या उतींमुळे पूर्णपणे बंद आढळले. प्रगत 'इलेक्ट्रोकॉटेरी' तंत्रज्ञानाचा वापर करून डॉक्टरांनी त्या भागात एक लहान छिद्र तयार केले. त्यानंतर गाईडवायर अत्यंत सावधगिरीने त्या अडथळ्यातून पार करून, 'फ्लुओरोस्कॉपिक इमेजिंग' द्वारे नैसर्गिक श्वसनमार्ग सुरक्षितपणे पूर्ववत होत असल्याची खात्री करण्यात आली. श्वसनमार्गात प्रवेश मिळाल्यानंतर, 'कंट्रोल्ड रेडियल एक्सपॅन्शन' (CRE) बलून डिलेटेशनच्या साहाय्याने अरुंद झालेला मार्ग हळूहळू रुंदावण्यात आला. डाव्या फुप्फुसाच्या वरच्या आणि खालच्या उप-श्वसनमार्गातही अडथळे आढळले, जे अत्यंत सूक्ष्मपणे दुरुस्त करण्यात आले. तसेच, अडथळ्याच्या मागे साचलेला घट्ट कफ (म्युकस प्लग) देखील टीमने यशस्वीरीत्या बाहेर काढला.

या उपचारांचे परिणाम तात्काळ आणि थक्क करणारे होते. बंद पडलेल्या फुप्फुसात पुन्हा हवा पोहोचली आणि ते पूर्ववत पसरले. रुग्णाच्या श्वासाचा त्रास लक्षणीयरीत्या कमी झाला आणि कायमस्वरूपी गमावले मानले गेलेले फुप्फुस पुन्हा कार्यरत झाले. रुग्णाची प्रकृती अत्यंत वेगाने सुधारली. प्रक्रियेच्या अवघ्या तीन दिवसांनंतर तिला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. आता तिचा श्वासोच्छवासाचा त्रास पूर्णपणे थांबला आहे. फुप्फुसाचे कार्य पूर्ववत झाल्यामुळे ती आता दैनंदिन कामे, व्यायाम सहज करू शकत असून एक सामान्य व सक्रिय आयुष्य जगत आहे. या प्रकरणाबाबत बोलताना डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजिस्ट आणि फुप्फुस प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. राहुल केंद्रे म्हणाले, "क्षयरोगाचा संसर्ग बरा झाल्यानंतरही श्वसनमार्गाशी संबंधित गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होऊ शकतात. अशा अनेक प्रकरणांमध्ये निकामी झालेले फुप्फुस पुन्हा बरे होणे अशक्य वाटते. मात्र, प्रगत इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजी तंत्रांच्या मदतीने फुप्फुसामध्ये अजूनही कार्य करण्याची क्षमता आहे की नाही, याचे सखोल मूल्यांकन करता येते. फुप्फुस कायमस्वरूपी अकार्यक्षम झाले आहे असा निष्कर्ष काढण्यापूर्वी रुग्णाचे सर्वंकष पुनर्मूल्यांकन करणे किती महत्त्वाचे आहे, हे या प्रकरणातून स्पष्ट होते."

डॉ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाल्या, "प्रगत आणि विशेषीकृत फुप्फुसविषयक उपचारांमुळे रुग्णेला पुन्हा तिचे सामान्य जीवनमान प्राप्त करता आले, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. नाविन्यपूर्ण उपचारपद्धती आणि तज्ज्ञ वैद्यकीय सेवा रुग्णांपर्यंत पोहोचविण्याच्या आमच्या बांधिलकीचे हे यश प्रतीक आहे."

डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व कोषाध्यक्ष, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे, म्हणाले, "कायमस्वरूपी निकामी झाल्याचे मानले गेलेले फुप्फुस पुन्हा कार्यान्वित करणे ही उल्लेखनीय वैद्यकीय कामगिरी आहे. गुंतागुंतीच्या श्वसनविकारांमध्ये विशेष तज्ज्ञता, प्रगत तंत्रज्ञान आणि सर्वंकष उपचारपद्धतीचे महत्त्व या प्रकरणातून अधोरेखित होते." डॉ. रेखा आर्कोट, अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे, म्हणाले, "गुंतागुंतीच्या श्वसनविकारांवर उपचार करताना अचूक निदान, विशेष वैद्यकीय कौशल्य आणि प्रगत उपचारतंत्रांचा वापर किती महत्त्वाचा आहे, हे या प्रकरणातून अधोरेखित होते. रुग्णाच्या फुप्फुसाचे कार्य यशस्वीपणे पूर्ववत करणे हे आमच्या वैद्यकीय पथकाच्या समर्पणाचे आणि रुग्णांचे जीवनमान सुधारण्यासाठी आधुनिक, कमीत कमी शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या उपचारपद्धतींच्या क्षमतेचे प्रतीक आहे." हे प्रकरण गुंतागुंतीच्या श्वसनमार्गाच्या विकारांवर उपचार करण्यासाठी आणि फुप्फुसाचे कार्य पुन्हा पूर्ववत करण्यासाठी इंटरव्हेन्शनल पल्मोनोलॉजीची वाढती भूमिका अधोरेखित करते. तसेच, क्षयरोगावरील उपचारानंतरही दीर्घकाळ श्वास घेण्यास त्रास होत असलेल्या किंवा इतर गुंतागुंती निर्माण झालेल्या रुग्णांनी तज्ज्ञांचा सल्ला घेणे किती महत्त्वाचे आहे, हेही या प्रकरणातून स्पष्ट होते.

थोडक्यात पण महत्वाचे



समूहगानामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची जागृती - कौशल इनामदार

पुणे : दैनिक संध्या

सध्याच्या आधुनिक युगामध्ये पाश्चिमात्य चालीरितींचा प्रभाव असल्याने आपल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती आणि संस्कारित समूहगीतांची सातत्याने उजळणी करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी नुकतेच येथे केले. भारत विकास परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांतस्तरीय राष्ट्रीय समूहगान स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी परिषदेचे पदाधिकारी दत्ता चितळे, सचिन परांजपे, राजेंद्र जोग आणि शिवाजीनगर शाखेचे अध्यक्ष देवदत्त चंदावरकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी इनामदार पुढे म्हणाले की, समूहगान करताना विद्यार्थ्यांची सर्वांना बरोबर घेऊन एका सुरात गाण्याची सवय महत्वाची ठरते. गायकांचे स्वरच फक्त एकरूप होतात असे नाही, तर स्वरांबरोबरच सर्वांचे श्वाससुद्धा एकात्म भावनेने ऊर्जा निर्माण करतात. मी संगीत क्षेत्रात काम करीत असल्यामुळे असे अनुभवाला येते की, लहानपणी विद्यार्थ्यांच्या मुखात जे गीत प्रचलित होते आणि गुणगुणले जाते, त्या गीताचे भाव आणि विचार आयुष्यभर त्या विद्यार्थ्याला देशभक्तीची सतत जाणीव करून देतात. असे उपक्रम सर्व स्तरावर होण्याची गरज आहे. हिंदी व संस्कृत भाषेत झालेल्या या समूहगान स्पर्धेमध्ये एकूण १४ शाळांच्या संघांनी भाग घेतला होता. हिंदी गीतांच्या स्पर्धेत पुण्यातील सिम्बायोसिस प्रशालेने तर संस्कृत गीतांच्या स्पर्धेत सांगलीच्या पोतदार इंटरनॅशनल संघाने प्रथम क्रमांक पटकावला व हा संघ अहमदाबाद येथे होणाऱ्या क्षेत्रीय स्पर्धांसाठी पात्र ठरला आहे. हिंदी भाषेतील द्वितीय क्रमांक अमृता विद्यालय, निगडी, तृतीय क्रमांक कवठेकर प्रशाला, पंढरपूर तर संस्कृत भाषेतील द्वितीय क्रमांक आदर्श शाळा, नाशिक, तृतीय क्रमांक सिम्बायोसिस प्रशाला, पुणे यांना मिळाला. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पांडुरंग मुखडे, तुषार रिठे आणि संगीता माटे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया दांडेकर यांनी केले.




१६ ते १८ दरम्यान 'प्रवाह बिझनेस एक्स्पो २०२६'; उद्योजकांना व्यवसायवृद्धीची संधी

पुणे : दैनिक संध्या

अग्रवाल समाज पुणे यांच्या वतीने 'प्रवाह बिझनेस एक्स्पो २०२६' या तीन दिवसीय व्यवसाय प्रदर्शनाचे आयोजन १६ ते १८ ऑक्टोबरदरम्यान डेक्कन कॉलेज मैदान, पुणे येथे करण्यात आले आहे. 'सोच से सफलता तक' या संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनाच्या माध्यमातून उद्योजक, व्यावसायिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांना एकाच व्यासपीठावर आणून व्यवसायवृद्धी, नेटवर्किंग आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याचा उद्देश आहे. अशी माहिती अग्रवाल समाज पुणेचे अध्यक्ष ईश्वरचंद गोयल यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अग्रवाल समाज पुणेचे सेक्रेटरी संजय अग्रवाल, कोषाध्यक्ष दीपक बंसल, सहसचिव मुकेश कनोडीया आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रदर्शनात विविध क्षेत्रांतील व्यावसायिक कंपन्या आणि उद्योजक सहभागी होणार असून, त्यांच्या उत्पादनांचे व सेवांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. यासोबतच प्रमुख व्याख्याने, परिसंवाद, चर्चासत्रे, व्यावसायिक नेटवर्किंग आणि सामुदायिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील व्यावसायिकांच्या सहभागामुळे नवीन व्यावसायिक संबंध निर्माण करण्याची आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. या प्रदर्शनात सर्व समाजातील नागरिकांना विनामूल्य प्रवेश देण्यात येणार आहे. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी, १६ ऑक्टोबर रोजी उद्घाटन समारंभ केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांच्या उपस्थितीत होणार आहे. यानंतर 'लीडरशिप लेगसी' या विषयावरील चर्चासत्र, महिला नेतृत्व आणि व्यवसायवृद्धी यांवरील सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. त्यानंतर अग्रवाल समाजासाठी दांडिया नाईटचे आयोजन करण्यात येणार आहे. १७ ऑक्टोबर रोजी 'महासंगम समिट', ब्रँडनिर्मिती आणि नफावाढ या विषयावरील विशेष व्याख्यान, 'व्हिजनरी लीडर्स' चर्चासत्र तसेच 'आरोग्य संवाद : हेल्थ फर्स्ट' हा आरोग्यविषयक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. प्रदर्शनाच्या अंतिम दिवशी, १८ ऑक्टोबर रोजी 'वॉक ओव्हर कॉफी', युवकांसाठी विशेष उपक्रम, करिअर समुपदेशन, पुरस्कार वितरण आणि अग्रसेन जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात विविध उद्योग क्षेत्रांतील नामवंत उद्योजक आणि व्यावसायिक सहभागी होणार आहेत.

सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा'चा ट्रेलर लाँच

■ पुणे (दै. संध्या)



सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. कुत्र्याला घाबरणाऱ्या एका निवृत्त कर्मचाऱ्याची कथा केंद्रस्थानी ठेवून अनोखी गोष्ट "कापूसकोंडा" चित्रपटातून उलगडणार असून, २३ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच आलेल्या टीजरला रसिक प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. आता या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे. पॅनोरामा स्टुडिओस प्रस्तुत व्हीपी माऊली ग्रुप ऑफ कंपनीज सह स्टोरीवाला फिल्म हा चित्रपट सादर करीत असून जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा.लि. यांनी 'कापूसकोंडा' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'कापूसकोंडा' चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांच आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. गाणी संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी सुरबद्ध केली आहेत, तर पार्श्वसंगीत अभिजीत हेगडेपाटील या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे.

'अ फॅमिली डॉग फिल्म' अशी टॅगलाइन असलेल्या या चित्रपटात अत्यंत अनोखी कथा पहायला मिळणार आहे. निवृत्त कर्मचारी आणि त्याला भेट मिळालेला कुत्रा यांच्या नात्यावर आधारित ही गोष्ट आहे. एका कुत्र्यामुळे काय काय घडामोडी घडतात, त्यातून मानवी भावभावना, नातेसंबंध कशा पद्धतीनं उलगडत जातात हे पहाणं मजेशीर ठरणार आहे. सत्यघटनेवरून ही कथा प्रेरित असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. उत्तम कथानक, सक्षम अभिनेत्यांची फौज असलेला कापूसकोंडा हा चित्रपट नक्कीच परिपूर्ण मनोरंजनाची हमी देणारा असल्याचं ट्रेलरवरून जाणवत आहे.

श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट ; पुढील पाच वर्षांसाठी निवड

■ पुणे (दै. संध्या)



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी यांची एकमताने निवड करण्यात आली. सोमवारी (दि.१२ ऑक्टोबर) झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही निवड पाच वर्षांसाठी आहे. तसेच माजी अध्यक्ष सुनील रासने यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

विश्वस्त मंडळाच्या बैठकीला ट्रस्टचे सुनील रासने, महेश सूर्यवंशी, विद्यमान उपाध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, विश्वस्त राजेंद्र गावडे, पराग वांबूरे, रोहित लोंढे आदी उपस्थित होते. बैठकीनंतर सर्व विश्वस्तांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली.

नवनियुक्त अध्यक्ष महेश सूर्यवंशी यांचे शिक्षण बी.ई. सिव्हिल झाले असून ते बांधकाम व्यावसायिक आहेत. सन १९८४ मध्ये सुवर्णयुग तरुण मंडळाच्या माध्यमातून ते या कार्यात सक्रीय झाले. तर, सन १९९६ साली सुवर्णयुग तरुण मंडळाच्या कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली. सन २००१ साली श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या विश्वस्त पदी त्यांची नियुक्ती झाली होती. त्यानंतर सन २०१० साली ट्रस्टच्या कोषाध्यक्षपदाचा कार्यभार त्यांनी स्वीकारला.

त्यांचे वडील ॲड. शंकरराव सूर्यवंशी हे श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे संस्थापक कोषाध्यक्ष होते. वित्तीय कामकाजातील काटेकोरपणा, सुसूत्रता आणि उत्तम व्यवस्थापन ही महेश सूर्यवंशी यांची कार्यवैशिष्ट्ये असून ट्रस्टसाठी कोंढवा येथे बालसंगोपन केंद्र आणि वृद्धाश्रमाची सुंदर वास्तू सिव्हील इंजिनिअर म्हणून त्यांनी उभी केली. 'सार्वजनिक विश्वस्त संस्था सत्ताकेंद्र न होता मानवसेवेचे सेवाकेंद्र झाले पाहिजे', हा त्यांचा विचार आहे. त्यानुसार पुढील काळात कार्य करण्याचा त्यांचा संकल्प आहे. मागील बैठकीतील निर्णयानुसार १४ वर्षांचे नियोजित अध्यक्ष सन २०२२-२४ यासाठी ट्रस्टच्या अध्यक्षपदी माणिक चव्हाण यांनी कार्यकाळ पूर्ण केला. त्यानंतर सन २०२४-२६ अशा दोन वर्षांसाठी ट्रस्टच्या अध्यक्षपदी सुनील रासने हे कार्यरत होते. आता सन २०२६-३१ या पाच वर्षांसाठी महेश सूर्यवंशी हे अध्यक्षपदाची धुरा सांभाळणार आहेत. तर, सन २०३१ – ३६ या त्यापुढील पाच वर्षांसाठी हेमंत रासने हे ट्रस्टचे अध्यक्षपद भूषवणार आहेत.

एआय शिकण्यापासून ते प्रत्यक्ष निर्मितीपर्यंत

महाराष्ट्रातील तरुणीची सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमधून भरारी!

■ पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) ज्ञान मिळवण्यापासून ते या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडवण्यापर्यंतचा प्रवास महाराष्ट्रातील तरुणी सुनिधिश्री प्रभाकरन हिने यशस्वीपणे सुरू केला आहे. सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसच्या माध्यमातून तिने कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र अध्ययन आणि नव्या तंत्रज्ञानातील कौशल्यांना व्यावहारिक अनुभवाची जोड दिली असून, आरोग्यसेवा, शेती आणि वैद्यकीय संशोधन अशा विविध क्षेत्रांत आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. सुनिधिश्री ही मुंबईतील डी. वाय. पाटील रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे संगणक अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. सुरुवातीपासूनच कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्र अध्ययन आणि आधुनिक तंत्रज्ञानाविषयी विशेष आवड असलेल्या सुनिधिश्रीला सॅमसंगच्या इनोव्हेशन कॅम्पस या कौशल्यविकास कार्यक्रमातून आपल्या आवडीला प्रत्यक्ष कामाची जोड देण्याची संधी मिळाली. सॅमसंगचा हा प्रमुख तंत्रज्ञान कौशल्यविकास कार्यक्रम १८ ते २५ वयोगटातील तरुणांना उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्ये, प्रत्यक्ष प्रशिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान देतो. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता, प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याचा आणि भविष्यातील तंत्रज्ञानाधारित करिअरसाठी स्वतःला तयार करण्याचा अनुभव मिळतो. सुनिधिश्रीने या कार्यक्रमाच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केवळ शैक्षणिक प्रकल्पांपुरता मर्यादित न ठेवता, दैनंदिन जीवनातील समस्या सोडवण्यासाठी कसा करता येतो, याची समज विकसित केली. "सॅमसंग इनोव्हेशन कॅम्पसमुळे मला कृत्रिम बुद्धिमत्तेवर प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळाला.

मतदार यादीवरील दावे व हरकती दाखल करण्यास २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

■ पुणे (दै. संध्या)

■ विशेष सघन पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर

■ अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्याच्या कालावधीत २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत १२ ऑक्टोबरपर्यंत निश्चित करण्यात आली होती. सुधारित कार्यक्रमानुसार दावे व हरकती दाखल करण्याची प्रक्रिया २६ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून, प्राप्त दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर २०२६ ही अर्हता तारीख निश्चित करून महाराष्ट्रासह १९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदार यादीचे विशेष सघन पुनरीक्षण जाहीर केले आहे. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर दावे व हरकती दाखल करण्यासाठी १२ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती.

वोल३डी कडून पुण्यात 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'चे आयोजन

३डी प्रिंटिंग क्षेत्रातील लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न

■ पुणे (दै. संध्या)



वोल३डी आणि क्रिएलिटी यांनी मिळून पुण्यातील ब्लूम येथे 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'चे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात ३डी प्रिंटिंगमध्ये रस असलेले लोक, क्रिएटर्स, व्यावसायिक, एंटरप्रेन्योर्स आणि वेगवेगळ्या वस्तू तयार करणारे लोक सहभागी झाले.

भारतात वाढत असलेल्या ३डी प्रिंटिंग समुदायातील लोकांनी एकमेकांना भेटावे आणि आपले अनुभव शेअर करावेत, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. उपस्थितांनी नवीन कल्पनांवर चर्चा केली, ३डी प्रिंटिंगमधील आपले अनुभव सांगितले आणि एकमेकांशी संपर्क वाढवला. कार्यक्रमात चर्चा, प्रॉडक्ट्सची माहिती, एकमेकांशी ओळख करून घेण्याच्या संधी आणि विविध उपक्रमांचा समावेश होता. त्यामुळे हा कार्यक्रम केवळ टेक्नॉलॉजीपुरता मर्यादित राहिला नाही. लोकांना एकमेकांकडून शिकता यावे, एकत्र काम करता यावे आणि पुढे जाण्याच्या नव्या संधी मिळाव्यात, यासाठी हे एक चांगले व्यासपीठ ठरले.

पुणे हे वोल३डी आणि क्रिएलिटी या दोन्ही कंपन्यांसाठी महत्त्वाचे शहर आहे. या दोन्ही कंपन्यांनी मिळून कोरेगाव पार्कमधील कोपा मॉल येथे भारतातील पहिले ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरू केले.

या स्टोअरमध्ये विद्यार्थी, क्रिएटर्स, एंटरप्रेन्योर्स आणि व्यावसायिकांना ३डी प्रिंटिंग तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता आणि वापरून पाहता येते. पुण्यात 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया' आयोजित करणे हे तंत्रज्ञान अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या आणि या क्षेत्रातील लोकांना एकत्र आणण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल होते.

वोल३डीचे सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक राहुल चंदालिया म्हणाले: "आमच्या प्रवासात पुण्याचे खास स्थान आहे. क्रिएलिटी सोबत येथे भारतातील पहिले ३डी प्रिंटिंग रिटेल स्टोअर सुरू केल्यानंतर, आता पुण्यात शेअरफेस्ट आयोजित करणे हे आमच्या ध्येयाच्या दिशेने आणखी एक पाऊल आहे. लोक एकमेकांना भेटतात, विचार शेअर करतात आणि एकमेकांकडून शिकतात, तेव्हा ३डी प्रिंटिंगचे क्षेत्र खऱ्या अर्थाने वाढते आणि मजबूत होते." 'क्रिएलिटी शेअरफेस्ट इंडिया'सारख्या उपक्रमांमधून वोल३डी आणि क्रिएलिटी लोकांना एकमेकांशी जोडण्याची, एकत्र काम करण्याची आणि भारतातील ३डी प्रिंटिंगच्या विकासात योगदान देण्याची संधी देत आहेत.

थोडक्यात पण महत्वाचे



स्व. नाना पाटेकर यांच्या निवासस्थानी आमदार शेखर निकम यांची भेट

पुणे : दैनिक संध्या

ज्येष्ठ अभिनेते आणि नाम फाउंडेशनचे संस्थापक स्व. नाना पाटेकर यांच्या निधनाने कला, सामाजिक कार्य आणि समाजाप्रती संवेदनशीलतेची जाणीव जपणाऱ्या एका व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी पुणे येथील डोणजे येथे त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी आमदार शेखर निकम यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. एखादी व्यक्ती आपल्या कार्यातून, विचारांतून आणि माणुसकीच्या नात्यांतून समाजाच्या मनात अढळ स्थान निर्माण करते. स्व. नाना पाटेकर यांचे व्यक्तिमत्त्वही असेच होते. अभिनयाच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवतानाच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण केला. नाम फाउंडेशनच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि संकटग्रस्त कुटुंबांसाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या संवेदनशील मनाची साक्ष देणारे आहे. माणूस आपल्या कार्याने मोठा होतो आणि आपल्या माणुसकीने कायम स्मरणात राहतो, याची जाणीव स्व. नाना पाटेकर यांच्या जीवनप्रवासातून होते. त्यांच्या आठवणी, त्यांनी जपलेली सामाजिक बांधिलकी आणि समाजासाठी केलेले कार्य सदैव प्रेरणा देत राहील. या दुःखद प्रसंगी आमदार शेखर निकम यांनी कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करत त्यांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळावे, अशी भावना व्यक्त केली. या भेटीतून राजकीय किंवा सार्वजनिक पदाच्या पलीकडे जपलेली माणुसकीची नाती आणि दुःखाच्या क्षणी आपुलकीने पाठीशी उभे राहण्याची संवेदनशीलता अधोरेखित झाली.

प्रकाश भुजबळ यांचा उबाठा सेनेत प्रवेश



चाकण : दैनिक संध्या

सलग सतरा वर्षे चाकण नागरी पतसंस्थेचे संचालक पद भूषविलेले येथील उद्योजक प्रकाश हरिभाऊ भुजबळ यांनी उबाठा सेनेत प्रवेश केला. चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात खासदार संजय राऊत यांनी भुजबळ यांना शिवबंधन बांधले. शिवसेनेची धगधगती मशाल व हातात झेंडा घेऊन भुजबळ हे आपल्या कार्यकर्त्यांसमवेत उबाठा सेनेत दाखल झाले. याप्रसंगी खेडचे आमदार बाबाजी काळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, जिल्हा उपप्रमुख शिवाजी वरपे, जिल्हा परिषदेचे सदस्य विजय शिंदे, खेड तालुकाप्रमुख किरण गवारे, राजगुरुनगर बँकेच्या संचालिका विजया शिंदे, लक्ष्मण जाधव, शहर प्रमुख नितीन वाव्हळ आदी उपस्थित होते. खासदार संजय राऊत व जिल्हाप्रमुख रामदास धनवटे यांच्या हस्ते भुजबळ यांचा सन्मान करण्यात आला. भुजबळ यांनी सांगितले की," उबाठा शिवसेनेची ध्येय धोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करू. सर्वांना बरोबर घेऊन लोकोपयोगी कामे करण्यावर भर दिला जाईल."

धम्मचक्र दिनानिमित्त शिवसेनेची १४ ऑक्टोबरला 'धम्म समता जागृती' बाईक रॅली

मुंबई : दैनिक संध्या

धम्मचक्र दिनानिमित्त शिवसेनेच्या (शिंदे गट) वतीने १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत 'धम्म समता जागृती' बाईक रॅली काढण्यात येणार आहे. विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांच्या हस्ते रॅलीचा प्रारंभ होणार असून, चैत्यभूमी येथे होणाऱ्या समारोप सभेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार आहेत. या रॅलीत सुमारे ५०० जण सहभागी होणार असल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष तथा माजी आमदार राम पंडागळे यांनी दिली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार तसेच भगवान बुद्धांचा अहिंसा आणि शांततेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश असल्याचे पंडागळे यांनी सांगितले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली होती. त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत त्यांचे महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेबांना अधिक काळ आयुष्य लाभले असते, तर संपूर्ण भारत बौद्धमय झाला असता, अशी खंत पंडागळे यांनी व्यक्त केली. मंत्रालयाशेजारील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सकाळी नऊ वाजता रॅलीला सुरुवात होईल. मुंबईतील विविध मार्गांवरून मार्गक्रमण केल्यानंतर ही रॅली दुपारी चैत्यभूमी येथे पोहोचणार आहे. तेथे जाहीर सभा होऊन रॅलीचा समारोप होईल.

सणासुदीत घराच्या रंगकामाची चिंता मिटणार!


एशियन पेंट्सची खास सेवा

- लग्नसमारंभ आणि सणांसाठी घराला नवा साज
- 'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस'द्वारे वेळेत रंगकाम पूर्ण करण्याची हमी

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

लग्नसमारंभ असो वा सणासुदीचे दिवस, घराला नवा साज देण्याची इच्छा प्रत्येकालाच असते. मात्र, रंगांची निवड, वेळेचे नियोजन आणि रंगकामाची देखरेख यामुळे अनेकदा घरमालकांची धावपळ होते. ग्राहकांची हीच अडचण लक्षात घेऊन एशियन पेंट्सने आपल्या 'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस'च्या माध्यमातून घराच्या रंगरूपात बदल घडवून आणण्याचा सुलभ आणि त्रासमुक्त अनुभव देणारी नवीन मोहीम सुरू केली आहे.

लग्नाच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर साकारलेली ही मोहीम कुटुंबातील उत्साह, आनंद आणि घर सजवण्याची लगबग अधोरेखित करते. घरमालकांना विविध रंगसंगती आणि सजावटीच्या कल्पना निवडण्यापासून ते प्रत्यक्ष रंगकाम पूर्ण होईपर्यंत व्यावसायिक मदत कशी मिळू शकते, हे या मोहिमेतून दाखवण्यात आले आहे. या मोहिमेतील एका चित्रफितीत प्रसिद्ध फॅशन डिझायनर सब्यसाची यांनी डिझाइन केलेल्या वॉलपेपरचे विविध पर्याय दाखवण्यात आले आहेत. या वॉलपेपरच्या माध्यमातून घराला वैयक्तिक आवडीनुसार आकर्षक रूप देता येते. दुसऱ्या चित्रफितीत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रंगदृश्य तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली आहे. या सुविधेमुळे घरमालकांना प्रत्यक्ष रंगकाम सुरू होण्यापूर्वी निवडलेले रंग आणि वॉलपेपर आपल्या घरात कसे दिसतील, याचा अंदाज घेता येतो.



'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस'अंतर्गत रंग आणि डिझाइनविषयक मार्गदर्शन, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने रंगांचे दृश्यरूप पाहण्याची सुविधा, आधुनिक रंगकामाची साधने आणि कामावर देखरेख करण्यासाठी नियुक्त तज्ज्ञ उपलब्ध करून दिले जातात. यासोबतच वेळेत काम पूर्ण करण्याची हमी आणि २० टक्के पैसे परत मिळण्याचे आश्वासनही देण्यात आले आहे. त्यामुळे ग्राहकांना रंगकामाच्या प्रक्रियेतील अनावश्यक धावपळ टाळून घराच्या सजावटीचा आनंद घेता येतो.

या मोहिमेच्या शुभारंभप्रसंगी एशियन पेंट्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सिंगले म्हणाले, "ग्राहकांना आपल्या घराचा कायापालट करताना अंतिम परिणाम जितका महत्त्वाचा वाटतो, तितकाच संपूर्ण अनुभवही सुरळीत आणि त्रासमुक्त असावा, अशी त्यांची अपेक्षा असते. लग्नसमारंभ आणि सणासुदीच्या काळात ही गरज अधिक महत्त्वाची ठरते. घराच्या सजावटीची कल्पना करण्यापासून रंग आणि वॉलपेपर निवडणे, तसेच वेळेत रंगकाम पूर्ण करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर 'ब्युटीफुल होम्स पेंटिंग सर्व्हिसेस' ग्राहकांना मदत करते. त्यामुळे घरमालकांना आपल्या प्रिय व्यक्तींसोबत महत्त्वाचे क्षण आनंदाने घालवता येतात आणि घराच्या कायापालटाची जबाबदारी आमच्यावर सोपवता येते."

एशियन पेंट्सच्या या सेवेमध्ये रंगविषयक सल्ला, नियोजन, व्यावसायिक रंगकाम आणि संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख अशा सुविधांचा समावेश आहे. ही सेवा देशातील १२०० हून अधिक शहरांमध्ये उपलब्ध असून, आतापर्यंत ५.७ लाखांहून अधिक ग्राहकांनी तिचा लाभ घेतला आहे.

ट्रॉन्टेकचा बॅटरी एनर्जी स्टोरेज क्षेत्रात विस्तार

२०२८ पर्यंत १२ GWh उत्पादन क्षमतेचे उद्दिष्ट



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारतीय बॅटरी आणि ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनी ट्रॉन्टेक इलेक्ट्रॉनिक्सने (Trontek Electronics) बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम (BESS) क्षेत्रात विस्तार करण्याची घोषणा केली आहे. भारतातील वाढत्या ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी कंपनी देशांतर्गत विकसित आणि उत्पादित ऊर्जा साठवणूक प्रणाली तयार करणार आहे. कंपनीने २०२८ पर्यंत १२ GWh बॅटरी उत्पादन क्षमता उभारण्याचे दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवले आहे. ट्रॉन्टेकच्या BESS पोर्टफोलिओमध्ये घरगुती वापरापासून ते व्यावसायिक, औद्योगिक आणि युटिलिटी-स्तरीय ऊर्जा साठवणुकीपर्यंत विविध उपायांचा समावेश असेल. यामध्ये औद्योगिक आणि मोठ्या वीज प्रकल्पांसाठी ५ MWh क्षमतेची कंटेनराइज्ड ऊर्जा साठवणूक प्रणाली तसेच व्यावसायिक आस्थापना आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधांसाठी विशेष बॅटरी उपायांचा समावेश आहे. इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि बॅटरी तंत्रज्ञान क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे ट्रॉन्टेक आता व्यापक ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात आपला व्यवसाय विस्तारत आहे. बॅटरी प्रणाली, ऊर्जा साठवणूक आणि चार्जिंग सोल्यूशन्स या क्षेत्रांमध्ये क्षमता वाढवण्यावर कंपनीचा भर आहे. स्थानिक अभियांत्रिकी, उत्पादन आणि संशोधन-विकासाच्या माध्यमातून भारतीय परिस्थिती आणि ऊर्जेच्या गरजांनुसार ऊर्जा साठवणूक उपाय विकसित करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. ट्रॉन्टेकचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सम्रथ एस. कोचर म्हणाले, "ऊर्जा साठवणूक हा ट्रॉन्टेकच्या प्रवासातील एक नैसर्गिक पुढचा टप्पा आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून आम्ही बॅटरी आणि ऊर्जा तंत्रज्ञान क्षेत्रात आपली क्षमता विकसित केली आहे. आता या अनुभवाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर ऊर्जेची साठवणूक आणि व्यवस्थापन करण्यासाठी करण्याची संधी आमच्यासमोर आहे."

ते पुढे म्हणाले, "भारताच्या ऊर्जा संक्रमणासाठी केवळ तांत्रिकदृष्ट्या सक्षम उपाय पुरेसे नाहीत, तर भारतीय परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन त्यांची रचना, अभियांत्रिकी आणि उत्पादन करणेही महत्त्वाचे आहे. भारतात ही क्षमता विकसित करून भविष्यातील संधींसाठी तिचा विस्तार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

४ भावंडांचे यूपीएससीत यश!

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती गरिबीची असली तरीही अनेकांचे स्वप्न मोठे असतात. प्रत्येकाला मोठं होऊन डॉक्टर, पायलट आयएएस अधिकारी, आयपीएस अधिकारी व्हायचं असतं. त्यामुळे जोमाने अभ्यास करून सर्व आव्हानांवर मत करत यश गाठतात. अशीच एक घटना उत्तर प्रदेशातील प्रतापगड जिल्ह्यातील लालगंज शहरातून समोर आली आहे. एका ग्रामीण बँकेत व्यवस्थापक असलेले अनिल मिश्रा त्यांची पत्नी आणि चार मुले असा त्यांचा परिवार आहे. आर्थिक परिस्थिती सर्वसामान्यांसारखी असून ते त्यांच्या परिवारासह दोन खोल्या असणाऱ्या घरात राहत होते. त्यांच्या चारही मुलांचे प्राथमिक शिक्षण हिंदी माध्यमाच्या शाळांमध्ये झाले. कुटुंबातील दोन मुली माधवी आणि क्षमा, यांनी यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. सुरुवातीला कठोर परिश्रम करूनही त्यांना यश मिळाले नाही. यामुळे त्यांच्या घरातील वातावरण काहीसे निराशाजनक झाले होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः पुणे जिल्हा आणि परिसरातील लोकांना तसेच मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर जी.पुणे येथील लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते कि, गाव मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर जी.पुणे येथील जमीन गट न.२८८/१ शिवाजी गेनभाऊ बेलकर यांचे मालकीचे मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर जी.पुणे येथील जमीन गट न. २८८/१ क्षेत्र ८.८० हे. आर पो.ख.३.९६ हे. आर पैकी खाते न. २२६२ मधील क्षेत्र ३.९७.५० हे. आर, पो.ख. ०.२२.५० हे. आर एकूण क्षेत्र ४.२० हे. आर आकार २.३२ पैसे यांचे कायदेशीर मालकी हक्क ताबेवहिवाट ची होती व आहे. वर जमिनी आमचे वरील अशीलांनी मिराबाई लक्ष्मण आहेर रा. आणे ता. जुन्नर पुणे यांना विक्री करण्याचे निश्चित केले आहे. तरी वरील नमूद मिळकती बाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, कर्ज बोजे, सावकारी बोजे, कायदेशीर हक्क हितसंबंध तसेच इतर कुठल्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्याबाबत आमचे अशिलांना लेखी स्वरुपात पुराव्याचे कागदपत्रांनिशी आमचे अशीलांशी किवा आमचे अशीलांचे वकील यांचेशी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाच्या आत संपर्क साधावा न साधल्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही. असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यांतर कोणाचीही हरकत/तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲडव्होकेट
खरात पी.पी.
नारायणगाव ता. जुन्नर पुणे

ठिकाण :- आळेफाटा
तारीख :-१२/१०/२०२६

विवोने नवीन एस२ एफई केला सादर



■ नवी दिल्ली (दै. संध्या)

विवो इंडियाने आज विवो एस२ एफई स्मार्टफोन सादर करून भारतातील आपल्या एस-सिरीज पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे. देशातील आधुनिक आणि नेहमी कनेक्टेड असणाऱ्या तरुणांच्या बदलत्या गरजा आणि मागण्या लक्षात घेऊन हा स्मार्टफोन डिझाइन करण्यात आला आहे. विवो एस२ एफईचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याची शक्तिशाली १०,००० mAh बॅटरी. 'सर्वात लांब इलेक्ट्रॉनिक उत्पादन चाचणी लाइव्हस्ट्रीम'साठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड स्थापित करून या बॅटरीने जागतिक स्तरावर आपली प्रभावी क्षमता सिद्ध केली आहे, ज्यामध्ये तब्बल ३२ तास आणि ३७ मिनिटांचा कालावधी नोंदवला गेला आहे. दीर्घकाळ टिकणारी बॅटरी, आधुनिक डिझाइन, आकर्षक मनोरंजन, व्यावहारिक इमेजिंग आणि सुरळीत कामगिरीसह, विवो एस२ एफई वापरकर्त्यांना पॉवर्ड, कनेक्टेड आणि प्रत्येक सामाजिक क्षणासाठी तयार ठेवण्यासाठी डिझाइन केला आहे.

लांबचा प्रवास आणि गेमिंग सेशन्सपासून ते स्ट्रीमिंग, कंटेंट क्रिएशन आणि सामाजिक क्षणांपर्यंत, याची शक्तिशाली बॅटरी वापरकर्त्यांना स्मार्टफोन कमी वापरण्याची चिंता न करता अधिक शोध घेण्याचे, अधिक काही करण्याचे आणि त्यांच्या आवडत्या अनुभवांमध्ये रमून जाण्याचे स्वातंत्र्य देते. नवीन ठिकाणे शोधणे असो, अनपेक्षित क्षण टिपणे असो, मनोरंजनाचा आनंद घेणे असो किंवा दिवसभर कनेक्टेड राहणे असो, Vivo S2 FE एक अखंड स्मार्टफोन अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे. Vivo S2 FE च्या केंद्रस्थानी सिग्नेचर S-सिरीज डिझाइन आहे, जे आजच्या तरुणाईची धाडसी आणि ट्रेंड-सजग मानसिकता प्रतिबिंबित करण्यासाठी डिझाइन केले आहे. स्टेलर ग्रीन, झेन व्हाइट आणि टायटन ब्लॅक रंगांमध्ये उपलब्ध असलेल्या या स्मार्टफोनमध्ये एक स्टायलिश कॅमेरा लूक आणि विशिष्ट डिझाइन घटक आहेत, जे त्याला एक वेगळी ओळख देतात. याचा तेजस्वी 1.5K AMOLED डिस्प्ले, ज्याची ग्लोबल पीक ब्राइटनेस 2000 nits आहे, तो स्टाईल आणि दैनंदिन मनोरंजनाचा एक परिपूर्ण मिलाफ आहे. किंमत आणि उपलब्धता हे डिव्हाइस २० ऑक्टोबर २०२६ पासून पार्टनर रिटेल स्टोअर्स, विवोची अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉनवर विक्रीसाठी उपलब्ध होईल.

जाहीर नोटीस


तमाम लोकांना विशेषतः पुणे जिल्हा आणि परिसरातील लोकांना तसेच मौजे आणे ता. जुन्नर जी. पुणे येथील लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते कि, गाव मौजे आणे ता. जुन्नर जी. पुणे येथील जमीन गट न.२१ व ५३ मधील सामाईक खातेदार प्रकाश विश्राम थोरात व इतर रा. आणे ता. जुन्नर पुणे येथील कायमचे रहिवाशी असून आमचे मालकीचे आणे जमीन मट न.२१ क्षेत्र ०.७७ आर पो.ख. ०.१० आर एकूण क्षेत्र ०.८७ आर आकार ०१.०७ पैसे पैकी आमचे १/२ हिस्स्याचे क्षेत्र क्षेत्र ०.३८.५० आर पो.ख. ०.०५ आर एकूण क्षेत्र ०.४३.५० आर व गट नं ५३ क्षेत्र ०.१२ आर एकूण क्षेत्र ०.१२ आर आकार ०.३७ पैसे यांचे कायदेशीर मालकी हक्क ताबेवहिवाट ची होती व आहे. वर जमिनी आमचे वरील अशीलांनी किरण लक्ष्मण आहेर रा.आणे ता. जुन्नर पुणे यांना विक्री करण्याचे निश्चित केले आहे. तरी वरील नमूद मिळकती बाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, भाडेपट्टा कर्ज बोजे, सावकारी बोजे, कायदेशीर हक्क हितसंबंध तसेच इतर कुठल्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्याबाबत आमचे अशिलांना लेखी स्वरुपात पुराव्याचे कागदपत्रांनिशी आमचे अशीलांशी किवा आमचे अशीलांचे वकील यांचेशी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाच्या आत संपर्क साधावा न साधल्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही. असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यांतर कोणाचीही हरकत/तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस

सही/-
ॲडव्होकेट
खरात पी.पी.
नारायणगाव ता. जुन्नर पुणे

ठिकाण :- आळेफाटा
तारीख :-१२/१०/२०२६

पेपरफ्रायने पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू केले नवीन 'स्टुडिओ'

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)



फर्निचर आणि गृहसजावटीच्या वस्तूंच्या क्षेत्रातील भारतातील आघाडीचे ई-कॉमर्स मार्केटप्लेस असलेल्या 'पेपरफ्राय'ने पुणे-पिंपरी-चिंचवडमध्ये आपला नवीन 'स्टुडिओ' सुरू केल्याची घोषणा केली. उच्च क्षमता असलेल्या शहरी बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती वाढवणे आणि भारतातील 'होम अँड लिव्हिंग' (घर आणि जीवनशैली) क्षेत्रात ग्राहकांशी 'ओम्नीचॅनेल' पद्धतीने (ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून) संवाद साधणे, या कंपनीच्या धोरणाचाच हा एक भाग आहे. सध्या पेपरफ्रायचे रिटेल जाळे देशभरातील ९० हून अधिक शहरांमध्ये पसरलेले असून, कंपनीची १५० हून अधिक स्टोअर्स कार्यरत आहेत. डिजिटल माध्यमाद्वारे उत्पादने शोधण्याची सोय आणि प्रत्यक्ष दुकानात जाऊन अनुभव घेण्याची (ऑफलाइन) विश्वासार्ह पद्धत यांचा सुरेख संगम साधून पेपरफ्रायच्या स्टुडिओनी भारतातील फर्निचर रिटेल क्षेत्राचे स्वरूप बदलले आहे. १०० हून अधिक फ्रँचायझी भागीदारांच्या सहकार्याने देशभरात 'FOFO' (फ्रँचायझीच्या मालकीचे आणि फ्रँचायझीद्वारेच चालवले जाणारे) स्टुडिओ सुरू करून कंपनीच्या 'ओम्नीचॅनेल' धोरणाला बळ दिले जात आहे. हा नवीन स्टुडिओ श्री. सुनील पिसाळ यांच्या भागीदारीत सुरू करण्यात आला असून, तो 'शॉप क्र. UG ५, ऐश्वर्यम वन मॉल, ब्लॉक ३, काळभोरनगर, पिंपरी-चिंचवड, पुणे - ४११ ०१९' या मोक्याच्या ठिकाणी स्थित आहे. येथे ग्राहक १,००० हून अधिक ब्रँड्सच्या फर्निचर आणि गृहसजावटीच्या उत्पादनांची विस्तृत श्रेणी पाहू शकतात, तसेच प्रशिक्षित डिझाइन तज्ज्ञांकडून वैयक्तिक मार्गदर्शनही मिळवू शकतात. या नवीन स्टुडिओच्या उद्घाटनाप्रसंगी बोलताना 'पेपरफ्राय'चे चीफ बिझनेस ऑफिसर हुसेन केसूरी म्हणाले, "श्री. सुनील पिसाळ यांच्या भागीदारीत पिंपरी-चिंचवड येथे नवीन स्टुडिओ सुरू करून महाराष्ट्रातील आमची उपस्थिती अधिक बळकट करताना आम्हाला आनंद होत आहे. भारताचे 'ऑटोमोबाईल हब' म्हणून ओळखले जाणारे पिंपरी-चिंचवड हे देशातील सर्वात गतिमान औद्योगिक केंद्रांपैकी एक आणि पुणे महानगर क्षेत्राचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. येथील मजबूत उत्पादन क्षेत्र (मॅन्युफॅक्चरिंग इकोसिस्टम), वाढत्या निवासी वसाहती आणि प्रगतीशील ग्राहक वर्ग यामुळे हे शहर 'होम अँड लिव्हिंग' (घरगुती फर्निचर व सजावट) श्रेणीसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ ठरले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः पुणे जिल्हा आणि परिसरातील लोकांना तसेच मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर जी.पुणे येथील लोकांना जाहीरपणे कळविण्यात येते कि, गाव मौजे शिंदेवाडी ता. जुन्नर जी. पुणे येथील जमीन गट न.२८८/५ व २८८/८ मधील सामाईक खातेदार बबन कारभारी भद्रीगे, वामन कारभारी भद्रीगे, राजेंद्र कारभारी भद्रीगे, रंजना भिकाजी उपशाम मयत यांचे वारस लक्ष्मण भिकाजी उपशाम विजय भिकाजी उपशाम, सुहास भिकाजी उपशाम, संदीप भिकाजी उपशाम, नम्रता संदेश येलवे यांचे हिस्स्यायाचे जमीन गट. न. २८८/५ क्षेत्र ८.८० हे. आर पो.ख. ३.९६ हे. आर आकार ५.१४ पैसे एकूण पैकी १/३ हिस्स्याचे क्षेत्र ०.९८ हे. आर पो.ख. ०.४४ आर व रंगनाथ सावित्रा उर्फ सावित्रु अभंग, बबन कारभारी भद्रीगे, वामन कारभारी भद्रीगे, राजेंद्र कारभारी भद्रीगे, रंजना भिकाजी उपशाम मयत यांचे वारस लक्ष्मण भिकाजी उपशाम विजय भिकाजी उपशाम, सुहास भिकाजी उपशाम, संदीप भिकाजी उपशाम, नम्रता संदेश येलवे जमीन गट न.२८८/८ मधील क्षेत्र ८.८० हे. आर पो.ख. ३.९५ हे. आर आकार ५.१४ पैसे एकूण पैकी १/३ हिस्स्याचे क्षेत्र ०१.९६ हे. आर पो.ख. ०.८८ आर हि शेत जमीन आमचे अशील रंगनाथ सावित्रा उर्फ सावित्रु अभंग, बबन कारभारी भद्रीगे, वामन कारभारी भद्रीगे, राजेंद्र कारभारी भद्रीगे, रंजना भिकाजी उपशाम मयत यांचे वारस लक्ष्मण भिकाजी उपशाम, विजय भिकाजी उपशाम, सुहास भिकाजी उपशाम, संदीप भिकाजी उपशाम, नम्रता संदेश येलवे यांचे कायदेशीर मालकी हक्क ताबेवहिवाट ची होती व आहे. वर जमिनी आमचे वरील अशीलांनी दिपक लक्ष्मण आहेर रा.आणे ता. जुन्नर पुणे यांना विक्री करण्याचे निश्चित केले आहे. तरी वरील नमूद मिळकती बाबत कोणाचे कोणत्याही प्रकारचे खरेदी विक्री, गहाण, दान, लीज, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, कर्ज बोजे, सावकारी बोजे, कायदेशीर हक्क हितसंबंध तसेच इतर कुठल्याही प्रकारचे कायदेशीर हरकत असल्यास त्याबाबत आमचे अशिलांना लेखी स्वरुपात पुराव्याचे कागदपत्रांनिशी आमचे अशीलांशी किवा आमचे अशीलांचे वकील यांचेशी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून आठ दिवसाच्या आत संपर्क साधावा न साधल्यास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही. असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यांतर कोणाचीही हरकत/तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस

सही/-
ॲडव्होकेट
खरात पी.पी.
नारायणगाव ता. जुन्नर पुणे

ठिकाण :- आळेफाटा
तारीख :-१२/१०/२०२६



थोडक्यात पण महत्वाचे



वाकडमधील कॅपिटल टॉवर सोसायटीत फ्लॅटला भीषण आग

वाकड : दैनिक संध्या

वाकड पोलीस चौकीजवळील कॅपिटल टॉवर सोसायटीमधील एका फ्लॅटला आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच भाजपचे शहर उपाध्यक्ष रामभाऊ वाकडकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. आगीत अडकलेल्या नागरिकांना अग्निशमन दलच्या मदतीने सुरक्षितपणे बाहेर काढून त्यांनी स्वतः रुग्णवाहिकेतून जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रामभाऊ वाकडकर यांनी तातडीने अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवेला पाचारण केले. संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत त्यांनी मदतकार्याला गती दिली. संकटाच्या प्रसंगी दाखवलेल्या या तत्परतेमुळे जखमी नागरिकांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मदत झाली. या दुर्घटनेत काही नागरिक आगीत अडकलेल्यांना त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे. संकटाच्या काळात नागरिकांच्या मदतीला धावून जाण्याची सामाजिक बांधिलकी रामभाऊ वाकडकर यांनी दाखवलेल्या तत्परतेतून अधोरेखित झाली. आपत्कालीन परिस्थितीत वेळेत मदत उपलब्ध करून देणे आणि संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे किती महत्त्वाचे आहे, हे या घटनेतून स्पष्ट झाले.

माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांना अभिवादन

पिंपरी : दैनिक संध्या

महानगरपालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त आज महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात पिंपरी चिंचवड नगरीचे शिल्पकार माजी नगराध्यक्ष दिवंगत अण्णासाहेब मगर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादन कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य विनोद नढे, उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते.



विद्यार्थ्यांनी अनुभवले तंत्रज्ञानाचे विश्व!

थेरगाव: दैनिक संध्या

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, नवोपक्रम आणि उद्योजकीय विचार विकसित करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या DICE (Developing Innovation Culture and Entrepreneurship) उपक्रमांतर्गत पीएम श्री माध्यमिक विद्यालय, थेरगाव येथील विद्यार्थ्यांसाठी JSPM कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ताथवडे येथे शैक्षणिक क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. या क्षेत्रभेटीत एकूण ४० विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील इनक्युबेशन सेंटर, रोबोटिक्स लॅब, मॅक लॅब, आयडिएशन लॅब तसेच VMC/CNC मशीन सेंटरला भेट दिली. या माध्यमातून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, संशोधन आणि नवकल्पनांच्या विश्वाची प्रत्यक्ष ओळख झाली. विविध प्रयोगशाळांमधील उपकरणे आणि तांत्रिक प्रक्रियांची माहिती घेताना विद्यार्थ्यांनी उत्सुकतेने सहभाग नोंदवला. क्षेत्रभेटीदरम्यान JSPM कॉलेजचे प्रा. डॉ. सचिन आर्गडे यांनी विद्यार्थ्यांना 'आयडिया क्रिएशन' या विषयावर मार्गदर्शन केले. नवीन कल्पना कशा सुचवाव्यात, त्यांना नावीन्यपूर्ण स्वरूप कसे द्यावे आणि त्या कल्पनांचे प्रत्यक्ष उपयोगात रूपांतर कसे करता येते, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी JSPM कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, ताथवडेचे संचालक डॉ. अविनाश बदादे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत नवकल्पना, संशोधन, उद्योजकता आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रोत्साहित केले. या शैक्षणिक क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि उद्योजकीय विचार विकसित करण्यासाठी ही भेट उपयुक्त ठरली. विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी अनुभव ठरला.



आट्यापाट्या स्पर्धेत एम. एम. महाविद्यालयाचा द्वितीय क्रमांक

■ काळेवाडी(दै. संध्या)

जिल्हा क्रीडा परिषद, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या आट्यापाट्या स्पर्धेत एम. एम. वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, काळेवाडीच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द आणि कौशल्याचे प्रदर्शन करत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या यशाबद्दल मराठवाडा मित्र मंडळाचे अध्यक्ष मा. भाऊसाहेब जाधव सर, महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. पद्मावती जट्टे मॅडम, क्रीडा शिक्षक रामेश्वर हराळे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे हार्दिक अभिनंदन केले.खेळाडूंनी मिळवलेल्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

कारमधील ५० लाखांची बॅग चोरणारे आरोपी ८ तासांत जेरबंद



■ रावेत (दै. संध्या)

कारमध्ये ठेवलेली ५० लाख रुपयांची रोकड बनावट चावीच्या मदतीने चोरून नेणाऱ्या दोन आरोपींना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी अवघ्या आठ तासांत ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखा युनिट-२, मालमत्ता विरोधी पथक आणि रावेत पोलिसांनी संयुक्त कारवाई करत चोरीस गेलेली संपूर्ण ५० लाख रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १०.५० ते १२.१५ वाजण्याच्या सुमारास पुनावळे येथील संदीप हॉटेलसमोरील सिमेंटच्या सर्व्हिस रोडवर एक कार पार्क करण्यात आली होती. या कारचे दरवाजे बनावट चावीच्या साहाय्याने उघडून त्यामध्ये ठेवलेली ५० लाख रुपयांची रोकड असलेली बॅग चोरून नेण्यात आली. याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी गुन्हे शाखा आणि रावेत पोलिसांना तातडीने तपास करून गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथके तयार करण्यात आली.

सीसीटीव्ही फुटेजमुळे तपासाला दिशा पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एक व्यक्ती बनावट चावीने कार उघडून ५० लाख रुपये असलेली बॅग घेऊन जात असल्याचे दिसून आले. पुढील तपासात फिर्यादीसोबत मुंबई येथे पैसे आणण्यासाठी गेलेल्या दोन व्यक्तींपैकी चारुदत्त शिवाजी बेंडाले याच्यावर संशय बळावला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने आपल्या मित्राला कारची बनावट चावी देऊन कारमध्ये ५० लाख रुपये असल्याची माहिती दिली आणि चोरी करण्यास सांगितल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी प्रसाद शिवाजी बनकर (वय २९, व्यवसाय सुपरवायझर, रा. चिंबळी, ता. खेड, जि. पुणे) आणि चारुदत्त शिवाजी बेंडाले (वय ३०, बांधकाम व्यवसाय, रा. निघोजे, ता. खेड, जि. पुणे) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण ५० लाख रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सहपोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड व बसवराज तेली, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रोहिदास पवार, परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव, सहायक पोलीस आयुक्त सुदर्शन राठोड आणि वाकड विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सुनील कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गुन्हे शाखा युनिट-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप सावंत, मालमत्ता विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, रावेत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ऋषिकेश घाडगे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. तांत्रिक विश्लेषण विभागाच्या मदतीनेही तपास करण्यात आला.

नवी सांगवीत मालमत्तेच्या वादातून आजीचा चाकूने वार करून खून

■ पिंपरी (दै. संध्या)

नवी सांगवी येथील क्रांती चौकातील शिंगोरे बिल्डिंगमध्ये मालमत्तेच्या वादातून एका वृद्ध महिलेची चाकूने वार करून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मंगल बाबूराव शिंगोरे (वय ६०) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी सांगवी पोलिसांनी मृत महिलेचा सावत्र नातू ओंकार किसन शिंगोरे याला ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मालमत्तेत हिस्सा दिला जात नसल्याच्या रागातून ओंकार याने हे कृत्य केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दोन ते तीन महिन्यांपूर्वी ऑनलाइन मागवलेल्या चाकूंच्या सेटमधील एका चाकूने त्याने आजीवर वार केल्याचे तपासात समोर आले आहे. आजीची हत्या केल्यानंतर आरोपी ओंकार शिंगोरे हा स्वतः सांगवी पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने पोलिसांसमोर गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीवर यापूर्वीही खून आणि खुनाचा प्रयत्न यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी मृत मंगल शिंगोरे यांच्या ३८ वर्षीय मुलीने दिलेल्या फिर्यादीवरून सांगवी पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे नवी सांगवी परिसरात खळबळ उडाली आहे.

केएसबी चौकात ट्रॅक्टर आणि दुचाकीची धडक

■ पिंपरी(दै. संध्या)



शहरातील केएसबी चौकाजवळ ट्रॅक्टर आणि दुचाकी यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात आठ वर्षांच्या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर तिचे आई-वडील गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केएसबी चौकातील पुलावर ट्रॅक्टरची दुचाकीला जोरदार धडक बसल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात दुचाकीवरील आठ वर्षीय चिमुकली हातिन फरान मोमीन हिचा मृत्यू झाला आहे. तर तिचे वडील फरान मोमीन (वय ३२), आई मारिना फरान मोमीन गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी निगडी येथील धनश्री हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, मृत मुलीचा मृतदेह पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघातानंतर ट्रॅक्टर चालकाचा शोध सुरू करण्यात आला.

अन्वी हिंगेची सुवर्णभरारी; आशियाई शालेय स्पर्धेत सुवर्ण आणि रौप्यपदकाची कमाई!

■ पिंपरी : (दै. संध्या)

भारताची युवा बुद्धिबळपटू आणि वुमन कॅन्डिडेट मास्टर किताबधारक अन्वी दिपक हिंगे हिने रशियातील तुला येथे १ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर दरम्यान झालेल्या विसाव्या आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत दिमाखदार कामगिरी करत भारताच्या शिरपेचात आणखी दोन मानाचे तुरे रोवले आहेत. अन्वीने मुलींच्या नऊ वर्षांखालील गटात जलदगती ब्लिट्झ प्रकारात सुवर्णपदक, तर स्टँडर्ड प्रकारात रौप्यपदक पटकावले. बुद्धिबळाची महासत्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रशियाच्या भूमीत विविध देशांतील प्रतिस्पर्ध्यांशी लढत मिळवलेल्या या दुहेरी यशामुळे अन्वीच्या आंतरराष्ट्रीय पदकांची संख्या आता पंधरावर पोहोचली आहे.

अन्वी ही चिंचवड येथील एलप्रो इंटरनॅशनल स्कूलमध्ये चौथ्या इयत्तेत शिकत आहे. लहान वयातच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या अन्वीला तिचे प्रशिक्षक ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे, आंतरराष्ट्रीय मास्टर निखिल दीक्षित आणि मानसिक प्रशिक्षण मार्गदर्शक ऋतू बळ्यान चौधरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. बुद्धिबळातील तांत्रिक तयारी, डावांचे विश्लेषण, स्पर्धात्मक अनुभव आणि मानसिक कणखरता या सर्व बाबींच्या जोरावर अन्वी सातत्याने प्रगती करत आहे.

अन्वीने ब्लिट्झ प्रकारात नऊ फेऱ्यांमध्ये आठ गुणांची कमाई करत स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले. तिच्या खात्यात आठ विजय आणि केवळ एका पराभवाची नोंद झाली. तिने नऊपैकी आठ गुण मिळवत दुसऱ्या क्रमांकावरील तुर्कमेनिस्तानच्या बागुल जुमायेवा हिला अर्ध्या गुणाने मागे टाकले. जुमायेवाला साडेसात गुणांसह रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर रशियाच्या लेयला इसायेवाने सहा गुणांसह तिसरे स्थान मिळवले.

अन्वीच्या ब्लिट्झमधील कामगिरीचे वैशिष्ट्य म्हणजे तिने स्पर्धेतील अनेक प्रमुख प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवला. कझाकस्तानच्या अमालिया येद्रेसहेवा, रशियाच्या मिया कुद्र्याशोवा आणि लेयला इसायेवा यांच्यावर मात करत तिने आपली गुणवत्ता सिद्ध केली. या तिन्ही खेळाडूंनी अंतिम क्रमवारीत अनुक्रमे चौथे, पाचवे आणि तिसरे स्थान मिळवले.

तुर्कमेनिस्तानच्या जुमायेवाविरुद्ध पाचव्या फेरीत झालेला एकमेव पराभव वगळता अन्वीने सर्व सामने जिंकले. पराभवानंतर खचून न जाता तिने सलग चार विजय मिळवत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत दबावाखाली दाखवलेली जिद्द, एकाग्रता आणि मानसिक कणखरता विशेष उल्लेखनीय ठरली.



या प्रकारात अन्वीने १,८३२ चे कामगिरी मानांकन नोंदवले, तर तिच्या फिडे ब्लिट्झ मानांकनात ५८ गुणांची वाढ झाली. स्पर्धेपूर्वी १,६१५ मानांकन असलेल्या अन्वीने आपल्या मानांकनापेक्षा सरस कामगिरी करत विजेतेपद मिळवले. ब्लिट्झ प्रकारात मर्यादित वेळेत अचूक निर्णय घेणे, प्रतिस्पर्ध्याच्या डावपेचांना तातडीने प्रत्युत्तर देणे आणि वेळेच्या दबावात शांत राहणे आवश्यक असते. अन्वीने या सर्व आघाड्यांवर प्रभावी कामगिरी केली.

ब्लिट्झमधील सुवर्णयशाबरोबरच अन्वीने स्टँडर्ड प्रकारातही सातत्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. मुलींच्या नऊ वर्षांखालील गटात तिने नऊ फेऱ्यांमध्ये साडेसहा गुण मिळवत दुसरे स्थान पटकावले. कझाकस्तानच्या अमालिया येद्रेसहेवाने आठ गुणांसह पहिले स्थान मिळवले, तर रशियाच्या मिया कुद्र्याशोवाने सहा गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला.

स्पर्धेत सहभागी होताना अन्वीचे मानांकन सर्वोच्च होते. संपूर्ण स्पर्धेत पदकाच्या शर्यतीत आपले स्थान कायम राखत तिने रौप्यपदक जिंकले. स्टँडर्ड प्रकारात खेळाडूंना प्रत्येक चालीचा सखोल विचार करण्यासाठी अधिक वेळ मिळतो. त्यामुळे डावाची दीर्घकालीन आखणी, प्याद्यांची रचना, पटावरील स्थानिक वर्चस्व, बचावात्मक कौशल्य आणि अंतिम टप्प्यातील अचूकता या बाबी निर्णायक ठरतात.

एका आंतरराष्ट्रीय स्पर्धेत वेगवान ब्लिट्झ प्रकारात सुवर्ण आणि स्टँडर्ड प्रकारात रौप्य अशी दोन पदके मिळवणे हे अन्वीच्या अष्टपैलू बुद्धिबळ कौशल्याचे द्योतक आहे. अन्वीचे बुद्धिबळ प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय मास्टर निखिल दीक्षित म्हणाले, "रशियासारख्या बुद्धिबळाची समृद्ध परंपरा असलेल्या देशात आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सुवर्ण आणि रौप्य अशी दोन पदके मिळवणे ही अन्वीसाठी महत्त्वाची कामगिरी आहे. विशेषतः ब्लिट्झमध्ये नऊपैकी आठ गुण मिळवून तिने दाखवलेली एकाग्रता, वेगवान निर्णयक्षमता आणि पराभवानंतर पुनरागमन करण्याची वृत्ती कौतुकास्पद आहे. स्टँडर्ड आणि ब्लिट्झ या दोन्ही प्रकारांत पदक मिळवणे तिच्या खेळातील अष्टपैलुत्व दर्शवते. या अनुभवातून शिकत तिने सातत्याने मेहनत घेतली, तर भविष्यात आणखी मोठ्या स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करण्याची क्षमता तिच्यात आहे." रशिया हा अनेक दशकांपासून जागतिक बुद्धिबळाच्या इतिहासातील प्रभावशाली देश राहिला आहे. सोव्हिएत काळापासून विकसित झालेल्या बुद्धिबळ प्रशिक्षणपद्धती, जागतिक दर्जाचे ग्रँडमास्टर्स, विश्लेषणाधारित तयारी आणि लहान वयापासून स्पर्धात्मक बुद्धिबळाला दिलेले महत्त्व यांमुळे रशियाने जागतिक स्तरावर विशेष स्थान निर्माण केले आहे.

तुला येथे झालेल्या या आशियाई स्पर्धेत भारतासह आशियातील विविध देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला.



जुन्नर सद्भावना क्रिकेट स्पर्धा २०२६ उत्साहात संपन्न

■ नारायणगाव (दै. संध्या)

■ जुन्नर पोलीस, पत्रकार, वकील, शांतता कमिटी यांचा खेळाडू वृत्ती जोपासत एकतेचा संदेश

शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्यात जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड यांच्या संकल्पनेतून खेळ मैत्रीचा आणि संदेश शांततेचा या उद्देशाने जुन्नर पोलीस, पत्रकार, वकील, शांतता कमिटी हे समाजात आपली जबाबदारी पार पाडणारे सर्व घटक यांच्यात शनिवार (दि.१०) रोजी जुन्नर सद्भावना क्रिकेट स्पर्धा २०२६ शंकरराव बुट्टे पाटील मैदान जुन्नर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. या खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या सद्भावना क्रिकेट स्पर्धेत पोलीस संघाने प्रथम क्रमांक, वकील संघाने द्वितीय क्रमांक तर पत्रकार संघाने तृतीय क्रमांक पटकावला. यानिमित्ताने जुन्नर न्यायालयाचे सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश अनंत बाजड सो., पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड, जुन्नर वकील बारचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे, यांसह जुन्नर तालुक्यातील पत्रकार, वकील बारचे सदस्य, पोलीस बांधव उपस्थित होते.

यावेळी न्यायाधीश बाजड सो म्हणाले की, पोलीस, पत्रकार, वकील आणि न्यायालय हे एकमेकांना जोडलेले क्षेत्र आहे. काही किरकोळ गोष्टी घडल्यास मनात ठेवू नका खेळाडू वृत्तीने सोडून द्या असे सांगत स्पर्धेचे कौतुक करत अनेक वर्षांनी मैदानात क्रिकेट खेळल्याचे त्यांनी सांगितले. तर पोलीस निरीक्षक गुंड सो. म्हणाले की, या स्पर्धेत कोणीही विजेता उपविजेता नाही, आपल्यात खेळाडू वृत्ती आणि एकोप्याचा संदेश देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगत यापुढेही असे उपक्रम राबण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

तर पत्रकार अशफाक पटेल म्हणाले की, पोलीस निरीक्षक गुंड साहेबांनी राबवलेल्या सद्भावना क्रिकेट स्पर्धा कौतुकास्पद उपक्रम असून या पुढच्या काळात सर्वजण सोबत येऊन असे उपक्रम राबवूयात असे सांगत शुभेच्छा दिल्या. तर वकील बारचे अध्यक्ष हाडवळे म्हणाले की, पोलीस, पत्रकार, वकील, न्यायाधिश हे सातत्याने काम करत असतात आणि त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होतं. या स्पर्धेच्या निमित्ताने आपल्यात असाच एकोपा रहावा आणि सर्वांनी आरोग्याकडे लक्ष द्यावे असे सांगितले. या स्पर्धेचे सूत्रसंचालन किरण वाजगे यांनी केले. प्रस्तावना पत्रकार विलास कडलाग यांनी तर आभार पत्रकार अशफाक पटेल व अरुण मोरे यांनी मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



स्पीड ब्रेकर व पालखी महामार्गावर स्ट्रीट लाईट बसविण्याची नागरिकांची मागणी

जेजुरी : दैनिक संध्या

जेजुरी शहरातील चिंचेची बाग ते नंदी चौक या रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. या परिसरात शाळा, महाविद्यालये, विविध महत्त्वाच्या आस्थापना तसेच खासगी पार्किंगची सुविधा असल्याने विद्यार्थी, नागरिक, भाविक आणि वाहनचालकांची सतत ये-जा सुरू असते. मात्र, या मार्गावरून अनेक वाहने वेगाने जात असल्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे चिंचेची बाग ते नंदी चौक तसेच गोसावी मठ ते प्रभाळे पार्किंग या मार्गावर आवश्यक त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. जेजुरी शहरातून जाणाऱ्या पालखी महामार्गावर ही रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी पादचारी, दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. महामार्गावर आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविल्यास रस्त्यावरील दृश्यमानता वाढून अपघातांचा धोका कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे नगरपरिषदेने या कामांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. या संदर्भात जेजुरी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन चिंचेची बाग ते नंदी चौक, गोसावी मठ ते प्रभाळे पार्किंग या मार्गावर स्पीड ब्रेकर बसविणे तसेच पालखी महामार्गावर स्ट्रीट लाईटची व्यवस्था करणे, अशी मागणी करण्यात आली आहे. श्रीमंत अहिल्यादेवी सेवा मंडळ आणि जिजामाता प्रशाळेच्या वतीनेही यापूर्वी अनेक वेळा या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. मात्र, नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्या! वाहनांचा वाढता वेग आणि रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाशामुळे निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन जेजुरी नगरपरिषदेने या मागण्यांची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा श्रीमंत अहिल्यादेवी चौक परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे. संबंधित मार्गावर स्पीड ब्रेकर आणि स्ट्रीट लाईटची व्यवस्था झाल्यास विद्यार्थी, नागरिक, भाविक आणि वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार असून वाहतूक अधिक सुरक्षित होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रशासनाने विलंब न करता आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

शिरूर परिसरात घुमला संबळाचा नाद

शिरूर : दैनिक संध्या

आदिशक्तीच्या वैविध्यपूर्ण रूपांच्या भव्य मिरवणुका, सोबत पारंपारिक वाद्यांचा जल्लोष... टाळ - मृदुंगांचा गजर तर कुठे ठेका धरायला लावणारा संबळ - तुणतूण्याचा बाज... शहर व परिसरात शारदीय नवरात्रोत्सवाला उत्साही वातावरणात सुरुवात झाली. सार्वजनिक ठिकाणी विविध रूपांच्या माध्यमातून तर घरोघरी घटस्थापनेच्या माध्यमातून लक्ष्मीची पावले उमटली... पाषाणमळा टेकडीवरील रेणुकामाता, सरदार पेठेतील चामुंडादेवी, आडत बाजारातील शितळा माता, जोशीवाडीतील महालक्ष्मी, गुजरमळ्यातील तुळजाभवानी, लाटेआळीतील दुर्गादेवी, सिद्धार्थनगरमधील अंबिका माता, सुभाष चौकातील यल्लम्मादेवी, काचीआळीतील लक्ष्मीमाता तसेच भवानी मातेच्या मंदिरात पारंपारिक पद्धतीने शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. रेणुकामाता मंदिरावर व पाषाणमळा टेकडीवर रोषणाई केली असून, नऊ दिवस विविध धार्मिक विधींचे आयोजन केले आहे. शहरात दहा सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळे असून विविध सामाजिक, धार्मिक उपक्रमांनी हा सोहळा साजरा केला जातो. विविध मनोरंजनाचे कार्यक्रम तसेच विविध स्पर्धांचे आयोजनही केले आहे. सुभाष चौकातील आझाद हिंद गणेश मंडळाने अंबिका माता, प्रोफेसर कॉलनीतील एकता मित्र मंडळाने दुर्गामाता, बी. सी. हौसिंग सोसायटीतील दर्शक मित्र मंडळाने जगदंबा माता, त्रिमूर्ती महिला मित्र मंडळाने तुळजाभवानी, काचीआळीतील जय भवानी मित्र मंडळाने दुर्गामाता, साईनगर मित्र मंडळाने भवानी माता, अंबिकामाता मित्र मंडळाने अंबिकामाता, इंदिरानगरमधील जय माता दी मित्र मंडळाने महालक्ष्मी, छत्रपती संभाजीनगर मधील जय भवानी नवरात्रोत्सव मंडळाने तुळजाभवानी, आदिशक्ती महिला मंडळाने परमेश्वरी देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे.

दौंडमध्ये चेन स्नॅचिंग करणाऱ्या दोन आरोपींना अटक

६ गुन्ह्यांची उकल : आरोपींकडून ५५ ग्रॅम सोन्याचे दागिने व मोटारसायकलसह एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ पुणे ग्रामीण पोलिसांची कारवाई

■ दौंड (दै. संध्या)



दौंड परिसरात चेन स्नॅचिंग करून महिलांचे सोन्याचे दागिने हिसकावून नेणाऱ्या दोन आरोपींना अटक करण्यात पुणे ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. या आरोपींकडून सुमारे ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि मोटारसायकल असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील चोरीच्या सहा गुन्ह्यांची उकल झाल्याची माहिती पुणे ग्रामीण पोलिसांनी दिली. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व दौंड पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल झालेल्या जबरी चोरीच्या घटनांची गांभीर्याने दखल घेत पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मालमत्तेविरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपास पथकाने गुन्ह्यांच्या घटनांचा अभ्यास करून आरोपींचा शोध सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन संशयित आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्यांनी विविध ठिकाणी केलेल्या चेन स्नॅचिंगच्या गुन्ह्यांबाबत माहिती दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे १.दीपक बलभीम पवार (वय २८), रा. आरोळे वस्ती, जामखेड, जि. अहिल्यानगर, २.युवराज सचिन लोखंडे (वय २४), रा. उंडेट, ता. इंदापूर, जि. पुणे. पोलिसांनी आरोपींकडून सुमारे ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा एकूण ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत दौंड, यवत परिसरातील संबंधित पोलीस ठाणे व इतर ठिकाणी दाखल असलेल्या चेन स्नॅचिंग व जबरी चोरीच्या सहा गुन्ह्यांची उकल झाल्याचे प्रेस नोटमध्ये नमूद करण्यात आले आहे. आरोपींविरुद्ध संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, बारामती विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंडचे पोलीस उपविभागीय अधिकारी बापूराव दडस,स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि दौंड पोलीस ठाण्याच्या पथकाने केली. या प्रकरणाचा पुढील तपास दौंड पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

१०.५ कोटींची नवीन पाणीपुरवठा योजना वीज जोडणी अभावी ठप्प

■ जेऊर (दै. संध्या)

■ अडचणीच्या काळात विशेष बाब म्हणून सहकार्य करण्याची ग्रामस्थांची मागणी

जेऊर (ता. अक्कलकोट) येथील गाव, तांडे आणि वाढीव वस्त्यांची पाणीटंचाई दूर करण्यासाठी जलजीवन मिशनअंतर्गत सुमारे १०.५ कोटी रुपये खर्चाची नवीन पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली आहे. हिळ्ळी येथील भीमा नदीपासून १९.५ किलोमीटर लांबीची पाइपलाइन, पाण्याच्या टाक्या आणि जलशुद्धीकरण केंद्राची कामे पूर्ण होऊन चाचणीही झाली आहे. मात्र, हिळ्ळी येथील जॅकवेल आणि जेऊर येथील जलशुद्धीकरण केंद्रासाठी नवीन वीज जोडणी आवश्यक आहे. थकबाकीचे कारण देत महावितरणने अद्याप कोटेशन दिले नसल्याने ऐन तीव्र पाणीटंचाईच्या काळात ही योजना सुरू होऊ शकली नाही. हिळ्ळी बंधाऱ्याच्या वरच्या बाजूस असलेल्या जॅकवेलपासून जेऊरपर्यंत नवीन डक्टाइल आयर्नची पाइपलाइन टाकण्यात आली आहे. तसेच १ लाख २५ हजार आणि २५ हजार लिटर क्षमतेच्या दोन पाण्याच्या टाक्या बांधून पूर्ण झाल्या आहेत. दररोज १२.५ लाख लिटर पाणी शुद्ध करण्याची क्षमता असलेले जलशुद्धीकरण केंद्र आणि गावातील वितरण व्यवस्थेची कामेही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केली आहेत. या सर्व कामांची चाचणी घेण्यात आली आहे. योजनेच्या अंतिम टप्प्यातील वीज जोडणी थकबाकीच्या कारणामुळे रखडली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि ग्रामपंचायत जेऊर यांनी महावितरणच्या सोलापूर येथील कार्यकारी अभियंत्यांकडे पत्राद्वारे जोडणीची मागणी केली आहे. मात्र, अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही. सध्या जेऊरमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवत असताना, सर्व कामे पूर्ण झालेली योजना केवळ वीज जोडणीअभावी बंद राहणे ग्रामस्थांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी नारायणगाव पोलिसांचा पुढाकार

■ नारायणगाव (दै. संध्या)



वारूळवाडी मार्केटमध्ये निर्भया पथकाकडून जनजागृती

महिलांची सुरक्षितता, कामाच्या ठिकाणी घ्यावयाची खबरदारी, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि बालकामगार प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यासाठी नारायणगाव पोलिसांच्या वतीने वारूळवाडी येथील कृषी उत्पन्न बाजार समिती, जुन्नरच्या उपबाजार आवारातील धना-मेथी मार्केटमध्ये समुपदेशन व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी आठ वाजता झालेल्या या उपक्रमात महिला, युवती, शेतकरी, वाहनचालक आणि हमाल यांना सुरक्षिततेविषयी महत्त्वपूर्ण माहिती देण्यात आली. नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथकाच्या प्रमुख महिला पोलीस उपनिरीक्षक स्वाती धोंगडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. निर्भया पथकाची भूमिका, महिलांनी कामाच्या ठिकाणी घ्यावयाची काळजी, संकटाच्या वेळी मदत मिळविण्याचे मार्ग, सायबर गुन्ह्यांपासून बचाव, मोबाईलचा सुरक्षित वापर आणि बालकामगार प्रतिबंधक कायद्याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. वारूळवाडी येथील धना-मेथी मार्केटमध्ये शेतमालाची खरेदी-विक्री, वाहतूक आणि इतर कामांसाठी दररोज अनेक महिला, शेतकरी व कामगार येत असतात. त्यामुळे महिलांनी आपल्या सुरक्षिततेबाबत सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. मोबाईलचा वाढता वापर लक्षात घेता अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, ओटीपी व बँक खात्याची गोपनीय माहिती कोणालाही न देणे आणि संशयास्पद फोन किंवा संदेशांपासून सावध राहणे, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. सायबर फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सतर्क राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले. यावेळी निर्भया पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक स्वाती धोंगडे यांनी महिला व युवतींना विशेष आवाहन केले.

कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे (झांबरशेठ) स्मृतिदिनी भूषण पुरस्कारांचे वितरण

■ नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्याच्या विकासात मोलाचे योगदान देणारे, आणे-माळशेज घाटाचे शिल्पकार आणि गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करणारे कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे उर्फ झांबरशेठ यांचा ५३ वा स्मृतिदिन ओतूर येथील चैतन्य विद्यालयात स्व. भरत एकनाथ तांबे सभागृहात आमदार शरद सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी कै.आ.श्रीकृष्ण रामजी तांबे आणि कै.आ.लता श्रीकृष्ण तांबे यांच्या नावाने दिले जाणारे भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमात पुण्यातील मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या संचालिका डॉ. मुक्ता अवचट पुणतांबेकर यांना कै. आमदार लतानानी श्रीकृष्ण तांबे भूषण पुरस्कार, तर बांधकाम व्यवसायिक,मॅनेजिंग डायरेक्टर देशपांडे रियालिटी पुणे चे प्रसाद गिरीधर देशपांडे यांना कै. आमदार श्रीकृष्ण रामजी तांबे भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.आमदार शरद सोनवणे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर आणि ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष अनिल तांबे यांच्या हस्ते मानपत्र व मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमात बोलताना आमदार शरद सोनवणे यांनी झांबरशेट यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, झांबरशेठ हे दूरदृष्टीचे नेते होते आणि माणसे जोडण्याची कला त्यांच्याकडे होती. आणे-माळशेज घाटाच्या माध्यमातून त्यांनी मुंबई आणि ग्रामीण भागाला जवळ आणले. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल विक्रीसाठी मुंबईची बाजारपेठ उपलब्ध झाली. १९७० च्या दुष्काळात त्यांनी कष्टकरी आणि आदिवासी बांधवांना रोजगार उपलब्ध करून दिला. दुर्गम भागात रस्ते निर्माण करण्यासह जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे, असे त्यांनी सांगितले. पुरस्काराला उत्तर देताना डॉ. मुक्ता अवचट - पुणतांबेकर यांनी गावाकडून मिळालेला सन्मान हा इतर पुरस्कारांपेक्षा अधिक मोलाचा असल्याची भावना व्यक्त केली. मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त करण्याचे काम समाधान देणारे असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही व्यसनाच्या आहारी जाऊ नये. मोबाईलचा अतिवापरही व्यसनाचे स्वरूप घेऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन, खेळ आणि विविध छंद जोपासून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी चैतन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या स्नेहभोजनासाठी सुरेश घुले व रोहिदास घुले यांनी १ लाख ५१ हजार रुपयांचा, तर दत्तात्रय पानसरे यांनी २१ हजार रुपयांचा धनादेश दिला. यावेळी देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. तसेच वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिकेही देण्यात आली.

कार्यक्रमापूर्वी झांबरशेठ आणि लतानानी तांबे यांच्या प्रतिमांची ओतूर गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी देण्यात आलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्या प्रा. डॉ. छाया तांबे, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, माधवराव डुंबरे,माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले,विनायक तांबे, तुषार थोरात, गंगाराम महाराज डुंबरे, महेंद्र पानसरे, संतोष तांबे, सागर दाते, सर्जेराव गाढवे, नितीन पाटील, प्रतीक अकोलकर, शरद माळवे, भगवंता घोडे, संजय हिरे, छबुराव तांबे, अनिल डुंबरे, दावल ठिकेकर, आत्माराम गाढवे, ज्ञानेश्वर पानसरे, दशरथ डुंबरे, अजित पानसरे, विलास सुतार, विश्वास तांबे, राजश्री भालेकर, रामकृष्ण घोलप, दिलीप घोलप, महादेव ओतूरकर, गुलाब गवांदे, रमेश डुंबरे, शिवाजी डुंबरे, शरद चौधरी, भानूविलास गाढवे, प्रभाकर तांबे, रघुनाथ तांबे, राजेंद्र डुंबरे, वैभव तांबे, विशाल तांबे, कैलास पानसरे, अनंतराव चौगुले, स्मिता डुंबरे, रंगनाथ घोलप, गणपत डोंगरे, भिवा माळवे, रामदास डुंबरे, विलास दांगट, सचिन घोलप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्राम विकास मंडळाचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरंदर पॅटर्नची राज्यात चर्चा : आडाचिवाडी ठरली महाराष्ट्रात नंबर वन

■ नाझरे सुपे (दै. संध्या)



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या पहिल्या वर्षाच्या निकालाने पुणे जिल्ह्याने राज्यात आपला दबदबा निर्माण केला आहे. या अभियानात पुणे जिल्हा परिषदेने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला असून, सर्वात मोठी आणि लक्षवेधी कामगिरी पुरंदर तालुक्याने केली आहे. पुरंदर तालुक्यातील आडाचिवाडी ग्रामपंचायतीने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून महाराष्ट्रात अव्वल स्थान पटकावले आहे. त्यामुळे सध्या राज्यभरात पुरंदर पॅटर्नची जोरदार चर्चा सुरू आहे.

राज्य शासनाने ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हे अभियान सुरू केले होते. पुणे जिल्ह्यातील एकूण २७६ ग्रामपंचायतींनी यात सहभाग घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाची अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात आली. जिल्हा आणि तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले. प्रत्येक तालुक्यासाठी पालक अधिकारी नेमण्यात आले. डिजिटल प्रणालीद्वारे दररोज कामाचा आढावा घेण्यात आला. 'समृद्ध दिवाळी', 'समृद्ध पाडवा', 'एक दिवस समृद्धीसाठी' यांसारख्या उपक्रमांमुळे गावांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले.


या अभियानातील सर्वात मोठे यश म्हणजे करवसुली. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी सुमारे २४५ कोटी रुपयांची थकीत करवसुली केली. त्यामुळे अनेक ग्रामपंचायती स्वावलंबी झाल्या. याशिवाय नागरिकांनीही विकासकामात हातभार लावत ७ कोटी ९७ लाख रुपयांची लोकवर्गणी दिली. हा लोकसहभागाचा मोठा पुरावा आहे.

या अभियानाचा खरा चेहरा ठरल्या महिला. जिल्ह्यात ११ हजार ९२ नवीन महिला बचत गट स्थापन झाले. ५ हजार १४७ बचत गटांना खेळते भांडवल देण्यात आले. त्यामुळे महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करता आला. आज जिल्ह्यातील ६० हजार ८३३ महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. ही महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मोठी झेप आहे. सामाजिक न्यायाचा वारसा जपत ४ हजार ९९५ दिव्यांग बांधवांना विशेष ओळखपत्रे देण्यात आली. तर १६ हजार ३८९ पात्र लाभार्थ्यांना सामाजिक अर्थसाहाय्य योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला. रोजगार हमी योजनेतून १ लाख ६५ हजार २७४ मनुष्यदिन रोजगार निर्माण करण्यात आला. पर्यावरण संवर्धनासाठी ७३४ जलस्रोतांचे बळकटीकरण करण्यात आले. ५ हजार २४४ शेतकऱ्यांच्या बांधावर सौर कृषिपंप बसले.

जिल्ह्यात ७ लाख १२ हजार ५८७ वृक्षांची लागवड करून हरितक्रांतीला चालना देण्यात आली. पायाभूत सुविधांमध्येही मोठी वाढ झाली. ६५१ शाळा आणि ८४६ अंगणवाडी केंद्रे अधिक सक्षम करण्यात आली. १५४ पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये सुधारणा करण्यात आली. ग्रामीण तरुणांसाठी २३० व्यायामशाळा उभारण्यात आल्या. एकंदरीत, पुणे जिल्ह्याच्या या यशात पुरंदर तालुक्याचा वाटा सर्वात मोठा आहे. आडाचिवाडीसारख्या छोट्या गावाने राज्यात प्रथम येऊन दाखवून दिले की, नियोजन आणि लोकसहभाग असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. याच कारणामुळे आज महाराष्ट्रात पुरंदर पॅटर्नची चर्चा होत आहे.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



साहित्यिक वारशाच्या संवर्धनासाठी शासन सहकार्य करणार : पालकमंत्री जयकुमार रावल

■ धुळे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आज जग झपाट्याने बदलत आहे. एका क्लिकवर कोणत्याही विषयाची माहिती उपलब्ध होत असली, तरी माहिती मिळणे आणि त्या माहितीचा विचार करून ज्ञान मिळवणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच वाचन, लेखन, चिंतन आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता जपली पाहिजे. विशेषतः नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे ही काळाची गरज आहे. धुळे जिल्ह्याला लाभलेला समृद्ध साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

सहाव्या धुळे जिल्हा मराठी साहित्य संमेलन व अहिराणी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्या अनुदानातून तसेच अहिराणी साहित्य परिषद आणि साहित्य भारती यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य सदाशिवराव माळी साहित्य नगरीत या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी महापौर मायादेवी परदेशी, स्वागताध्यक्ष तथा आमदार अनुप अग्रवाल, मार्गदर्शक माजी आमदार डॉ. शरद पाटील, संमेलनाध्यक्ष एल. जी. सोनवणे, माजी केंद्रीय मंत्री डॉ. सुभाष भामरे, प्रा. आशुतोष पाटील, कवी प्रकाश होळकर, माजी सनदी अधिकारी भाई नगराळे, माजी न्यायमूर्ती जे. टी. देसले, प्राचार्य जगदीश पाटील, विद्यावर्धिनी सभेचे सचिव युवराज करनकाळ, मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. संजीव गिरासे, अहिराणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य भगवान पाटील, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, माजी प्राचार्य डॉ. शेखर सुर्वंशी, अहिराणी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रकाश महाले, सचिव प्रभाकर शेळके यांच्यासह साहित्यिक, मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, साहित्य हे समाजाचे हृदय आहे. माणसाच्या भावना, विचार आणि अनुभवांना शब्द देण्याचे काम साहित्य करते. साहित्य माणसाला प्रेरणा देते आणि समाजाला नवी दिशा दाखवते. धुळे जिल्ह्याला कविता, नाटक, तत्त्वज्ञान आणि इतिहास संशोधनाचा समृद्ध वारसा लाभला आहे. प्राध्यापक पुरुषोत्तम पाटील, प्राध्यापक अनिल सोनार, कॉम्रेड शरद पाटील यांच्यासह अनेक साहित्यिक आणि विचारवंतांनी धुळ्याचे नाव मोठे केले आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळासारख्या संस्थांनी जतन केलेला ऐतिहासिक आणि साहित्यिक ठेवा नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे आरोग्य, शिक्षण, संशोधनासह अनेक क्षेत्रांत मोठे बदल घडत आहेत. वैद्यकीय तपासणीचे अहवाल समजून घेण्यापासून विविध विषयांची माहिती मिळवण्यापर्यंत हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे. मात्र, त्याचे फायदे आहेत तसे काही धोकेही आहेत. आज विद्यार्थी मोबाईल आणि लॅपटॉपमध्ये अधिक गुंतले आहेत. पुस्तके वाचण्याची आणि स्वतः लिहिण्याची सवय कमी होत आहे. पूर्वी वाचलेले महत्त्वाचे मुद्दे लिहून ठेवल्यामुळे ते अधिक चांगल्या प्रकारे लक्षात राहायचे. आज माहिती सहज उपलब्ध होत असली, तरी तिचे ज्ञानात रूपांतर करण्यासाठी वाचन आणि चिंतन आवश्यक आहे.लेखक पुस्तके लिहितात, प्रकाशक ती छापतात आणि ग्रंथालये उपलब्ध करून देतात; मात्र ही पुस्तके वाचणारेही तयार झाले पाहिजेत. त्यासाठी घर, शाळा, महाविद्यालये आणि ग्रंथालयांनी पुढाकार घेऊन मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले.

थोडक्यात पण महत्वाचे

चांदिवली प्रकल्पात नववा राष्ट्रीय पोषण माह उत्साहात साजरा

मुंबई : 'पोषणाचा अधिकार, सुदृढ भारताचा आधार' या संकल्पनेतून एकात्मिक बाल विकास सेवा योजना, चांदिवली प्रकल्पांतर्गत असल्फा, नारायणनगर बीट क्रमांक 5 आणि नौपाडा बीट क्रमांक 6 येथे नववा राष्ट्रीय पोषण माह उत्साहात साजरा करण्यात आला. बाल विकास प्रकल्प अधिकारी शरद कुऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात पोषण आहाराचे महत्त्व, कुपोषण प्रतिबंध, माता व बाल आरोग्य तसेच शासकीय योजनांची जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. अंगणवाडी सेविका अश्विनी गांगरकर यांनी प्रस्ताविकेत अंगणवाडी आणि बीट स्तरावर राबविण्यात आलेल्या पोषणविषयक उपक्रमांचा आढावा सादर केला. 'आपली अंगणवाडी, आपली जबाबदारी' आणि 'पौष्टिक भारत, सशक्त भारत' या संकल्पनांवर आधारित पोषण आहार प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनी तयार केलेल्या पौष्टिक पाककृतींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विविध भाज्या, कडधान्ये आणि फळांच्या माध्यमातून पोषणमूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. आकर्षक रांगोळी, सजावट आणि घोषवाक्यांच्या माध्यमातूनही पोषणविषयक संदेश देण्यात आले.

कुंभमेळा विकासकामांमुळे नाशिक-त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार

नाशिक : आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात सुरू असलेली विविध विकासकामे वेगाने पूर्णत्वाकडे जात असून, या कामांमुळे नाशिक व त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच भाविक, पर्यटक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेली सर्व कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या ध्वजारोहण संमारंभाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी आज त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट तसेच नाशिक येथील द्वारका सर्कल तसेच ओझर विमानतळ येथे भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती घेतली. यावेळी कामांची गती वाढवून ती वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

शेतकरी-शेतमजुरांना रोजगार, अन्नधान्य, पाण्यासह पशुधनाच्या चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन यावर भर

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील नागरिकांना पुढील सहा ते आठ महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. यासाठी रोजगारनिर्मिती, गरजूंपर्यंत अन्नधान्य पोहोचविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून देण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासोबतच्या बैठकीत दिली. केंद्रीय पथकाकडून दुष्काळी भागातील परिस्थितीबाबतचा अहवाल केंद्र शासनाला सादर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्रीय पथकाने अत्यंत विस्तृत दौरा करून तळागाळापर्यंत प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. त्यामुळे नागरिकांमध्ये आपल्या अडचणी समजून घेतल्याचे समाधान निर्माण झाले असल्याचे या वेळी केंद्रीय पथकाला सांगितले. केंद्रीय पथकाच्या संवेदनशील पाहणीमुळे दुष्काळाची तीव्रता केंद्र शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी झालेल्या बैठकीस आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकाचे प्रमुख तथा केंद्रीय संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत चांगला पाऊस झाल्याने विक्रमी उत्पादनाची अपेक्षा होती. पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत असतानाच त्यानंतर पावसात सुमारे दोन महिने खंड पडला. त्यामुळे सोयाबीन पिकाला अनेक ठिकाणी सर्वाधिक झळ बसली. तर कापूस, तूर आणि ऊस ही पिकेही बाधित झाली आहेत.

पाणलोट क्षेत्रांत चारा उत्पादन वाढविण्यात येईल

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विविध जिल्ह्यांत उपलब्ध चाऱ्याचा साठा 90 ते 120 दिवसांपर्यंतचा आहे. मातीमध्ये ओलावा असलेल्या पाणलोट क्षेत्रांत चारा उत्पादन वाढविण्यात येईल. उपलब्ध चारा शासनाने घोषित केलेल्या दराने खरेदी करून त्याच्या साठवणुकीची व्यवस्था केली जाईल. आवश्यकता भासल्यास चांगला पाऊस झालेल्या अन्य राज्यांतूनही चारा उपलब्ध करण्याचा विचार केला जाईल. पशुधन वाचविण्यासाठी गरजेनुसार चारा छावण्या आणि पशू छावण्यांचा पर्याय स्वीकारण्यात येईल. ग्रामीण भागातील नागरिकांना जलसंधारणाच्या कामांमध्ये सहभागी करून घेण्यात येईल. माथा ते पायथा या संकल्पनेनुसार विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती तसेच नवीन संरचनांची निर्मिती लोकसहभागातून केली जाईल. त्यामुळे गावांमध्ये रोजगार निर्माण होण्याबरोबरच नागरिकांना मदत व दिलासा मिळेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पाण्याअभावी रब्बीची पेरणी होण्याची शक्यता कमी असून उन्हाळी पिकांनाही वाव राहिलेला नाही. खरीप हंगामातील नुकसान रब्बी किंवा उन्हाळी पिकातून भरून काढण्याची संधीही यंदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. शेतीबरोबरच शेतमजुरी करणाऱ्या लहान शेतकऱ्यांसमोर उदरनिर्वाहाचे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून नियोजन करुन मदत देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुंबई आणि पुण्यासारख्या मोठ्या शहरांना काही दिवस झालेल्या पावसाचा लाभ झाला असला तरी उर्वरित महाराष्ट्रात, विशेषतः ग्रामीण भागातील लहान गावांमध्ये पाण्याचे स्रोत आटले आहेत. या भागांत मोठ्या प्रमाणावर टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे. टँकरद्वारे पाणी पुरवठ्यात तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक गावापर्यंत पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाणी पोहोचविण्याचा आराखडा राज्य शासन तयार करीत आहे. ऑगस्ट 2027 पर्यंत उपलब्ध पाण्याचे पहिले आरक्षण पिण्यासाठी करण्यात आले आहे. त्यात नागरिक आणि पशुधनासाठी आवश्यक पाण्याची स्वतंत्र तरतूद केली असून त्यानंतरच अन्य वापरासाठी पाणी उपलब्ध केले जाईल. या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. दुष्काळी परिस्थितीत केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून जलसाठ्यांतील गाळ काढणे, दुरुस्ती आणि पुनरुज्जीवनाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. यापूर्वी 25 हजार गावांमध्ये राबविलेल्या कामांमुळे 15 ते 17 टक्के पाणी तूट असतानाही त्या भागांना दिलासा मिळाला. सॉफ्टवेअर आणि ॲपच्या माध्यमातून अशा कामांची पारदर्शक अंमलबजावणी करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. राज्य शासन केंद्र सरकारच्या निकषांनुसार आकडेवारीवर आधारित सविस्तर आणि नेमके निवेदन सादर करणार आहे. केंद्रीय कृषीमंत्र्यांनी आगाऊ निवेदन सादर करण्याबाबत संपर्क केला आणि ते आम्ही सादर केले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी आंतरमंत्रालयीन गटाची बैठक लवकर घेऊन मदत देण्याची प्रक्रिया गतिमान करण्याचे आश्वासन दिल्याचेही त्यांनी सांगितले. पीक विम्याचे संरक्षण तुलनेने कमी असले तरी विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ लवकर मिळवून देण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या सहकार्याने प्रयत्न करेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओझर विमानतळावर आगमन व स्वागत



■ नाशिक (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओझर विमानतळावर आगमन झाले. यावेळी समवेत महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, जलसंपदा (विदर्भ, तापी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन तथा कुंभमेळा व नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन होते.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी मुख्यमंत्री व मंत्री महोदयांचे स्वागत केले. यावेळी आमदार गोकुळ गिते, प्रा. देवयानी फरांदे, दिलीप बनकर, ॲड राहुल ढिकले, विशेष पोलिस महानिरीक्षक संजय ऐनपूरे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, सिंहस्थ कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे आयुक्त जलज शर्मा, सार्वजानिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता अरुंधती शर्मा, पोलीस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी, निफाड उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरूळे, तहसीलदार विशाल नाईकवाडे आदी उपस्थित होते.

गावागावांत जलसंधारणाची कामे हाती घ्या

■ नाशिक, (दै. संध्या)

ग्रामीण भागाचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २.० पाण्याचा प्रत्येक थेंब साठविणे, तलावांतील गाळ काढणे, बंधाऱ्यांची दुरुस्ती आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. या कामांसाठी राज्य शासन आवश्यक निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्यावतीने आयोजित 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान लोकप्रतिनिधींचा महाकुंभ', मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा, अभियान २०२६-२७ चा शुभारंभ तसेच 'सरपंच परिसंवाद – दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

दुष्काळाचे सावट : संवेदनशील शासनाचा भक्कम आधार

■ मुंबई (दै. संध्या)

'एल निनो'चा अत्युच्च प्रभाव, हिंदी महासागरातील द्विध्रुव स्थिती आणि पावसासाठी आवश्यक कमी दाबाच्या क्षेत्राच्या अभावामुळे महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. बराचसा भाग हवामानातील टोकाचे चढ-उतार आणि निसर्गाची अवकृपा अनुभवत आहे. राज्याच्या ग्रामीण अर्थकारणाला चालना देणाऱ्या खरीप हंगामापुढे पर्जन्यमानातील मोठ्या तुटीने दुष्काळाचे आव्हान निर्माण केले आहे. शेतातील उभी पिके एक तर करपली आहेत किंवा ती पार वाळून गेल्याचे चित्र अनेक भागांत निर्माण झाले आहे. कुठे पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुरेसे जलसाठे निर्माण न झाल्याने पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्नही काही भागात आ वसून उभा आहे. दुष्काळाचे संकेत मिळत असतानाच स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्यासह काही दुष्काळी भागांना भेट दिली. प्रत्यक्ष बांधावर जाऊन त्यांनी दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटाच्या काळात राज्य शासन प्रत्येक शेतकऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी दिला.

परिस्थितीवर अत्यंत गांभीर्याने लक्ष ठेवून असलेल्या राज्य शासनाने कुठल्याही आकडेमोडीच्या तांत्रिकतेत न अडकता आपली संवेदनशील निर्णयक्षमता दाखवत तडकाफडकी दिलासा देणारे निर्णय जाहीर केले. या निर्णयांची अंमलबजावणीही सुरु झाली आहे. संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा कामाला लागल्याचे चित्र सर्वदूर दिसत आहे.

दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार २६५ तालुक्यांमध्ये 'प्रथम कळ' (Trigger-१) अंतर्गत अधिकृतपणे दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आपत्तीच्या क्षणी सामान्य नागरिकाला भक्कम प्रशासकीय आधार मिळणे ही केवळ औपचारिकता नसून शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे, याच जाणिवेतून हा निर्णय घेण्यात आला.

केवळ दुष्काळ जाहीर करून राज्य शासन थांबलेले नाही. सोबतच दुष्काळाने प्रभावित होणाऱ्या संभाव्य घटकांना दिलासा देणारा १२ कलमी आराखडाही राज्य शासनाने जाहीर केला आहे. दुष्काळात शेतकरी हा सर्वात प्रभावित होणारा घटक ठरतो. संभाव्य आर्थिक विवंचनेत सापडणाऱ्या शेतकऱ्यांना तातडीने काय दिलासा देता येईल, याचा गांभीर्याने विचार करून राज्य शासनाने निर्णय घेतले असून त्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी सुरूही झाली आहे. एकीकडे पिकांच्या नुकसानीचे अंतिम स्वरूप स्पष्ट झाल्यानंतर स्वतंत्र निर्णयाद्वारे नुकसानभरपाईची आर्थिक मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असतानाच, दुसरीकडे तातडीचे धोरणात्मक निर्णय लागूही



करण्यात आले आहेत.


बाधित तालुक्यांतील शेतकऱ्यांचा संपूर्ण जमीन महसूल माफ करण्यात आला. तसेच पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचे निर्देश देत शेतीशी निगडित सर्व प्रकारच्या कर्जवसुलीस स्थगिती देण्यात आली. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांचे वीजबिल आधीच माफ करण्यात आले असताना, आता त्यावरील क्षमतेच्या पंपांनाही चालू वीजबिलात विशेष सूट देण्यात आली आहे. शिवाय, वीज बिल थकबाकीमुळे कोणतीही शेती वीजजोडणी खंडित न करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना आगामी काळाची चिंता भेडसावणार नाही, याची पूर्ण काळजी राज्य शासनाकडून घेण्यात आली आहे. विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने काही महिन्यांपूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची यशस्वीपणे अंमलबजावणी केली होती. त्याद्वारे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला. आता दुष्काळाचे संकट उभे ठाकले असताना त्याच निर्धाराने शेतकऱ्यांना मदतीचा आधार देण्याची तयारी सुरू आहे. दुष्काळामुळे केवळ शेती आणि पिकांचेच नुकसान होत नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेतील इतरही घटक अडचणीत येतात. या अडचणींचे स्वरूपही वेगवेगळे असते. ही बाब लक्षात घेऊन राज्य शासनाने आपल्या निर्णयांद्वारे सामाजिक सुरक्षिततेवरही भर दिला आहे. दुष्काळाची झळ विद्यार्थ्यांच्या भवितव्याला बसू नये, याची काळजी राज्य शासनाने घेतली आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. दुष्काळाच्या काळात ग्रामीण भागात रोजगाराच्या शोधात मोठ्या प्रमाणात स्थलांतराची परिस्थिती निर्माण होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राज्य शासनाने ग्रामीण भागातील स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या निकषांमध्ये शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे पाऊल उचलले आहे.

कुटुंबांना अन्नधान्याची टंचाई जाणवू नये, यासाठी पुरवठा यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने व्यवस्था उभ्या करण्यात आल्या आहेत. आवश्यक तिथे पाण्याचे टँकर्स उपलब्ध करण्यात येत आहेत. जनावरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी चारा डेपो व छावण्यांचे पूर्वतयारी नियोजन आणि जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



थोडक्यात पण महत्वाचे



धामणीला खंडोबा मंदिरात घटस्थापना

मंचर: दैनिक संध्या

पुणे-नगर-नाशिक जिल्ह्यातील भाविकांचे कुलदैवत असलेल्या धामणी (तालुका आंबेगाव) येथील श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात रविवारी (दिनांक, ११ ऑक्टोबर) स्वयंभू सप्तशिवलिंग व खंडोबा, म्हाळसाई, व बाणाईच्या उत्सव मूर्ती समोर पारंपारिक वाद्याच्या गजरात घटस्थापना करण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले. रविवारी पहाटे स्वयंभू सप्तशिवलिंगाचा पंचामृताने रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला, त्यानंतर सप्तशिवलिंगावर खंडोबा म्हाळसा बाणाईच्या सर्वांग सुंदर लोभस पंचधातूच्या मुखवट्याची प्रतिष्ठापना करण्यात आली, यावेळी "सदानंदाचा येळकोट "चा जयघोष करून भंडारा उधळण्यात आला, त्यानंतर गाभाऱ्यातील देवाच्या पूर्वमुखी खंडोबा, म्हाळसाई व बाणाईच्या आणि उत्तर मुखी खंडोबाची मानलेली बहीण जोगेश्वरी यांच्या देखण्या मूर्तींना वस्त्रालंकार घालण्यात आले, पहाटे सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, राजेश भगत, यांच्यासह ग्रामस्थ व भाविकांच्या उपस्थितीत विधिवत पारंपरिक पूजा व आरती करण्यात आली, त्यानंतर गाभाऱ्यातील स्वयंभू सप्तशिवलिंगासमोर नवरात्राच्या घटाची विधीवत पारंपारिक पध्दतीने प्रतिष्ठापना "सदानंदाचा येळकोट" "जय मल्हार "या जय घोषात भंडारा उधळून पाकळणी करण्यात आली.नवरात्राच्या पहिल्या माळेच्या घटाला नागवेलीच्या पानाची माळ, व दही भाताचा नैवेद्य दाखवण्यात आला.त्यानंतर दर्शनासाठी भाविकांना मंदिर खुले करण्यात आले, यावेळी धामणी, लोणी, खडकवाडी, गावडेवाडी, महाळुंगे पडवळ, संविदणे, कवठे, अवसरी खुर्द, तळेगाव ढमढेरे येथील मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते, महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती. नवरात्राच्या निमित्ताने खंडोबा देवस्थानाच्या दोन्ही महाद्वारावर व शिखरावर व मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे,

शरद अत्रे यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन

पुणे : दैनिक संध्या



ज्येष्ठ कवी-लेखक शरद गणेश अत्रे यांच्या 'स्पर्श' (कवितासंग्रह), 'शरदाचं चांदणं' (लेखसंग्रह) आणि 'प्राजक्त फुले' (कथासंग्रह) या तीन पुस्तकांचा प्रकाशन समारंभ शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मोरेश्वर सभागृह, सीताबाग कॉलनी, दत्तवाडी, सिंहगड रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यकांत वैद्य, निवृत्त प्राचार्य तथा ज्येष्ठ कवी-लेखक उपस्थित राहणार आहेत.ज्येष्ठ उद्योजक व रोटरी इंटरनॅशनलचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर श्री. अरुण कुदळे यांच्या शुभहस्ते पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे.

पानच्या पर्यटन अभ्यासासाठी अमित कुलकर्णी यांची निवड

पुणे : दैनिक संध्या



जपानमधील पर्यटनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी पुण्यातील 'गेट सेट गो हॉलिडेज'चे संस्थापक आणि अनुभवी टूर लीडर अमित कुलकर्णी यांची 'व्हीजेटीएम जपान २०२६' या आंतरराष्ट्रीय पर्यटन उपक्रमासाठी निवड झाली. जपान नॅशनल टुरिझम ऑर्गनायझेशनच्या (जेएनटीओ) विशेष निमंत्रणावरून त्यांनी या उपक्रमात भारताचे प्रतिनिधित्व केले. या कार्यक्रमात २२ देशांतील पर्यटन क्षेत्रातील प्रतिनिधींनी सहभाग घेतला. भारतातून निवड झालेले कुलकर्णी हे या समूहातील एकमेव भारतीय पर्यटन प्रतिनिधी होते. जपानमधील पर्यटन संस्था, स्थानिक पर्यटन मंडळे, हॉटेल्स आणि अनुभवाधारित पर्यटन सेवांशी संवाद साधण्याची संधी त्यांना मिळाली. या दौऱ्यात इकोहॉ, निक्को, ओया हिस्ट्री म्युझियम, बांबू फार्म, बांबू हस्तकला कार्यशाळा आणि साके मद्यनिर्मिती केंद्रांना भेट देण्यात आली. जपानची संस्कृती, खाद्यपरंपरा, ग्रामीण पर्यटन, स्थानिक उद्योग आणि इतिहासाचा जवळून अभ्यास करण्यात आला. "जपानची ओळख केवळ टोकियो, माउंट फुजी किंवा बुलेट ट्रेनपुरती मर्यादित नाही. तेथील संस्कृती, स्थानिक जीवनशैली आणि वैशिष्ट्यपूर्ण अनुभव भारतीय पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सहभागामुळे भारतीय पर्यटकांसाठी जपानमधील नवीन पर्यटनस्थळे आणि वेगळे अनुभव देणाऱ्या सहली विकसित करण्यास मदत होणार आहे. तसेच भारत-जपान पर्यटन संबंधांना बळकटी मिळण्याची अपेक्षा आहे," असे अमित कुलकर्णी यांनी सांगितले.

सचिन मोहिते दिग्दर्शित, सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा'चा ट्रेलर लाँच

पुणे: दैनिक संध्या



सत्यघटनेवरून प्रेरित असलेल्या 'कापूसकोंडा' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. कुत्र्याला घाबरणाऱ्या एका निवृत्त कर्मचाऱ्याची कथा केंद्रस्थानी ठेवून अनोखी गोष्ट "कापूसकोंडा" चित्रपटातून उलगडणार असून, २३ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच आलेल्या टीजरला रसिक प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. आता या चित्रपटाचा ट्रेलर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे. पॅनोरामा स्टुडिओस प्रस्तुत व्हीपी माऊली ग्रुप ऑफ कंपनीज सह स्टोरीवाला फिल्म हा चित्रपट सादर करीत असून जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा.लि. यांनी 'कापूसकोंडा' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. 'कापूसकोंडा' चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांच आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. गाणी संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी सुरबद्ध केली आहेत, तर पार्श्वसंगीत अभिजीत हेगडेपाटील या चित्रपटाला लाभले आहे. चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर, अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे. 'अ फॅमिली डॉग फिल्म' अशी टॅगलाइन असलेल्या या चित्रपटात अत्यंत अनोखी कथा पहायला मिळणार आहे. निवृत्त कर्मचारी आणि त्याला भेट मिळालेला कुत्रा यांच्या नात्यावर आधारित ही गोष्ट आहे. एका कुत्र्यामुळे काय काय घडामोडी घडतात.

गांधी भवनमध्ये वैचारिक कवितांतून सामाजिक प्रश्नांवर प्रहार

'देश आमचा देह आहे, तरी आम्ही बोलू नये..?' कार्यक्रमात विद्रोही कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद



■ पुरंदर (दै. संध्या)

महात्मा गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने कोथरूड येथील गांधी भवनमध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताह २०२६ अंतर्गत 'देश आमचा देह आहे, तरी आम्ही बोलू नये..?' या वैचारिक कवितांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक विषमता, जातीय तेढ, शेतकऱ्यांची दुरवस्था, तरुणाईचे प्रश्न, गांधी-विचार आणि संविधानाची मूल्ये अशा विविध विषयांवरील कवितांनी कार्यक्रमाला वैचारिक आणि सामाजिक आशयाची उंची मिळाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सायली मनोहर यांनी संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन केले. सूत्रसंचालन करताना प्रशिक तायडे यांनी सामाजिक विषयांवरील वैचारिक आणि विद्रोही कविता या कार्यक्रमातून सादर होत असल्याचे सांगितले. कवी रवींद्र कांबळे यांनी 'तरी आपण बोलू नये' ही कविता सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर 'झाडे चहूकडे पण छाया कुठेच नाही, नाती अनेक झाली पण माया कुठेच नाही...' या सामाजिक आशयाच्या गझलेला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कवी किशोर आणि कवयित्री श्रेया यांच्या कवितांनी श्रोत्यांना भावविश्वात गुंतवून ठेवले. हृदयमानव अशोक यांनी 'मीच तुमचा कर्दनकाळ' या कवितेतून सामाजिक परिस्थिती आणि 'जेन-झी' पिढीसमोरील विविध प्रश्न मांडले. आवाजातील चढ-उतार आणि प्रभावी सादरीकरणामुळे त्यांच्या कवितेला विशेष प्रतिसाद मिळाला. सुभाष दवडे यांनी 'मजबुती का नाम महात्मा गांधी' या कवितेतून गांधी विचारांची महती अधोरेखित केली.

किशोर यांनी 'आपण रमतो आपल्या भारत देशात...' या कवितेतून जाती-धर्माच्या नावावर निर्माण होणारी तेढ, विषमता आणि सामाजिक अस्वस्थतेवर भाष्य केले. तरुण कवी विजय लोखंडे यांनी 'आपल्या दोघांचे लग्न होण्यापूर्वीच लग्न लावून द्यावे का तुझ्या जातीचे माझ्या जातीशी?' या कवितेतून आंतरजातीय विवाह आणि जातीय मानसिकतेवर प्रश्न उपस्थित केला. 'जात पाहून प्रेम करावे का?' असा थेट सवाल करत त्यांनी उपस्थितांना अंतर्मुख केले.

प्रशिक तायडे यांनी 'झेंडेवाले' या कवितेतून झेंड्यांच्या राजकारणावर भाष्य केले. कवयित्री प्राजक्ता यांनी गांधींना केवळ नोटांवरील चित्र किंवा 'राष्ट्रपिता' या चौकटीत मर्यादित ठेवण्याच्या मानसिकतेवर उपरोधिक भाष्य केले. 'हा देश म्हणजे फक्त लुटारूंचा देश नाही, कोणत्याही नेत्याची खासगी मालमत्ता नाही' या आशयातून देशातील शेवटच्या घटकाचा आवाज म्हणजेच देश असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

हृदयमानव अशोक यांनी 'गांधीवादी होण्यासाठी गांधी जगावे लागतात...' या कवितेतून गांधी विचारांच्या आजच्या संदर्भावर भाष्य केले. विजय यांनी 'बा भीमा, तू अजूनही जिवंत आहेस आमच्या मनात' या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची आठवण करून दिली. किरण प्रकाश यांनी 'दुष्काळातील शेतकरी' या कवितेतून शेतकऱ्यांच्या दुरवस्थेचे वास्तव मांडले.कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ कवी आणि आयोजक अशोक आप्पा सोनवणे यांनी दारूबंदीच्या विषयावर 'बेवडा शूट' ही कविता सादर केली. ते म्हणाले, "काळाच्या ओघात अनेक कविता नामशेष झाल्या. त्या पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम मी गेली ४० वर्षे विविध कार्यक्रमांतून करीत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातून आलो, रिक्षाचालक झालो; मात्र कवितेने मला सामाजिकदृष्ट्या श्रीमंत केले." सामाजिक संदेश देताना कोणाचे मन दुखावणार नाही, याची काळजी घेऊन राज्यभर कार्यक्रम करण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

महात्मा गांधी स्मारक निधीचे कार्यकर्ते आकाश आप्पा लक्ष्मण यांनीही कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तेजस भालेराव यांनी केले, तर आभार सूरज कुलकर्णी यांनी मानले. यावेळी अन्वर राजन, रमेश आढाव, बाळासाहेब कदम, श्रीराम टेकाळे, मुकुंद भाळकर, तेजस भालेराव, सूरज कुलकर्णी, चंद्रकांत जाधव, सत्यजीत कदम, हर्षवर्धन जाधव आदी उपस्थित होते.

सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात पारंपरिक पद्धतीने घटस्थापना



■ पुणे : (दै. संध्या)

सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिराच्या वतीने आयोजित सार्वजनिक नवरात्रोत्सवात पारंपरिक पद्धतीने बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत बडवे आणि सुप्रिया बडवे यांच्या हस्ते घटस्थापना झाली. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम देखील उत्सवात आयोजित करण्यात आले आहेत.

घटस्थापनेला ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, डॉ. तृप्ती अग्रवाल, भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांसह विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते. धार्मिकतेला सामाजिकतेची जोड देणारा, समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा सार्वजनिक नवरात्रोत्सव महालक्ष्मी मंदिरात दर वर्षीप्रमाणे यंदाही साजरा होत आहे.

उत्सवाच्या दहा दिवसांत अभिषेक, याग, महाआरती असे धार्मिक कार्यक्रम देखील मंदिरामध्ये होणार आहेत. सर्व धार्मिक कार्यक्रमांचे पौरोहित्य मिलिंद राहूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मंदिराच्या आजूबाजूच्या परिसरात ५० सीसीटीव्ही कॅमेरे आणि ५० हून अधिक सुरक्षारक्षक आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने सर्व खबरदारी घेण्यात आली असून, पुणेकरांनी मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी व्हावे, असे विश्वस्त मंडळाकडून आवाहन करण्यात आले आहे.सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजता भव्य सामूहिक श्रीसूक्त पठण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीसूक्त हे ऋग्वेदातील श्री महालक्ष्मी देवीच्या स्तुतीस समर्पित पवित्र वैदिक स्तोत्र आहे. सुख, समृद्धी, ऐश्वर्य, शांती आणि कल्याण यांचे प्रतीक असलेल्या देवी महालक्ष्मीच्या उपासनेत श्रीसूक्त पठणाला विशेष महत्त्व आहे. सामूहिक पठणातून भक्ती, सकारात्मक ऊर्जा आणि सामूहिक मंगलभावनेचा संदेश देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या विशेष सोहळ्यास पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांना प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पुणे शहरातील सर्व भाविक, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि देवीभक्तांनी या मंगलमय सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन देवीचा आशीर्वाद घ्यावा, असे आवाहन श्री महालक्ष्मी मंदिराच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

दुष्काळ निवारणासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांतून निधी उभारावा



■ पुणे : (दै. संध्या)

राज्यात यंदा दुष्काळाचे मोठे संकट असून, संकटग्रस्त बांधवांना मदत करण्यासाठी पुणेकरांनी पुढाकार घ्यावा. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दुष्काळ निवारणासाठी भरीव निधी उभारणे गरजेचे आहे. सामाजिक जाणिवेतून प्रत्येकाने या कामात योगदान द्यावे, असे आवाहन उद्योग व मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केले. यावेळी त्यांनी दुष्काळ निवारणासाठी १० लाख रुपये, तर युवासेना पुणे शहराध्यक्ष हेमंत बागुल यांनी पाच लाख रुपये आणि विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एक लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली.

३२ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवाचे उद्घाटन रविवारी (११ ऑक्टोबर) सामंत यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झाले. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार, माजी, उपसभापती आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, माजीमंत्री बाळासाहेब शिवरकर,शिवसेना महानगरप्रमुख माजी आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना शहर प्रमुख नाना भानगिरे, कर्नाटक मधील आमदार एम जी मुळे, अभिनेत्री श्वेता शिंदे, माजी नगरसेविका लता राजगुरू, नंदा लोणकर, मुख्तार शेख , विरेंद्र कीराड, आयोजक आबा बागुल, जयश्री बागुल, युवासेना पुणे शहराध्यक्ष हेमंत बागुल, सुधीर वाघूलीकर ,नंदकुमार बानगुडे, घनश्याम सावंत, नंदकुमार कोंढाळकर, रमेश भंडारी, अमित बागुल, सागर बागुल, सागर आरोळे, इम्तियाज तांबोळी, धनजंय कांबळे, अशोक शिंदे, अभिषेक बागुल, गणेश पवार, समीर शिंदे हे उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यात सिनेतारका भार्गवी चिरमुले, वैशाली जाधव, सानिया चौधरी, श्वेता परदेशी, झेबा शेख, डॉ. सुखदा खांडगे, मृण्मयी मोघे, आयली घिया,ऋजुता जुन्नरकर यांची विशेष उपस्थिती देखील होती.

सामंत म्हणाले,'आबा बागुल यांचे काम गेल्या दीड वर्षापासून जवळून पाहत आहे. त्यांनी दूरदृष्टीतून ई-लर्निंग स्कूल सुरू केले असून, भविष्यात वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याची त्यांची योजना महत्त्वाची आहे. पुणे नवरात्रौ महोत्सवाच्या माध्यमातून बोलीभाषा आणि लोककलांचे जतन करण्याचे काम होत आहे. मराठी भाषेच्या अर्थसंकल्पासाठी सुरुवातीला ५० कोटी रुपयांची तरतूद होती. आता ती ३६० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे स्मृतीप्रित्यर्थ कर्तुत्ववान नागरिकांचा कृतज्ञता पुरस्काराने गौरव



■ पुणे : (दै. संध्या)

चाकण : खेड तालुक्याचे माजी आमदार स्व.सुरेशभाऊ गोरे यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कर्तुत्वान नागरिकांचा कृतज्ञता गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात शिवसेना नेत्या तथा महाराष्ट्र विधान परिषदेच्या माजी उपसभापती आ. डॉ.नीलम गोऱ्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, आमदार महेश लांडगे, माजी आमदार विलास लांडे आदींच्या हस्ते कर्तुत्वान नागरिकांना कृतज्ञता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व.आ.सुरेशभाऊ गोरे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला उजाळा दिला. शिक्षण, आरोग्य, स्थानिक विकास आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने केलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे सांगत जनतेच्या हितासाठी काम करण्याची त्यांची तळमळ कायम स्मरणात राहील, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. स्व.सुरेशभाऊ गोरे यांनी पाहिलेली विकासाची स्वप्ने पूर्ण करणे आणि त्यांनी सुरू केलेले जनसेवेचे कार्य पुढे नेणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांचा विचार आणि जनसेवेचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन डॉ. निलम गोऱ्हे यांनी केले. स्व.सुरेशभाऊ गोरे यांचे भव्य स्मारक व महिला बचत गट भवन उभारण्याच्या दृष्टीने डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आमदार निधीतून २५ लाख रुपये उपलब्ध करून देण्याची घोषणा केली. तसेच स्मारकाच्या कामासाठी भविष्यातही आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे गोरे परिवारावर पूर्ण लक्ष असून त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्ह्यातील सर्व शिवसैनिक गोरे कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेना नेत्या तथा विधानपरिषदेच्या माजी उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, म्हाडाचे अध्यक्ष तथा शिरूर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, खेडचे आमदार बाबाजी काळे, भोसरीचे आमदार महेश लांडगे, माजी आमदार विलास लांडे, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे सदस्य विजय शिंदे, दीप्ती भोगाडे, तनुजा घनवट, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख, खेड पंचायत समितीच्या सभापती गौरी मुऱ्हे, खेड बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास धनवटे, पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर राहुल जाधव, ज्येष्ठ नेते वसंत नाना लोंढे, चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.